बुधवार, २३ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 23 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-26 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



सरला बेटचे सदगुरु गंगागिरी महाराज यांच्या 176 व्या अखंड हरिनाम सप्ताहात 'शुभमंगल सावधान'चा गजर घुमला. पानवी येथील ऐश्वर्या व किरतपूर येथील बाबासाहेब यांच्यावर अक्षदांचा वर्षाव करीत लग्नगाठ बांधून समाजासमोर आदर्श ठेवण्यात आला. या जोडप्याला आशीर्वाद महंत रामगिरीजी महाराज यांनी दिला. हरिनाम सप्ताहात लग्न होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने भाविक या अनोख्या लग्न सोहळ्याने हरखून गेले. छायाचित्र : शांताराम मगर

## प्रकाश राज विरोधात तक्रार दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेते प्रकाश राज यांना चांद्रयानाबद्दल ट्वीट करणे भोवले आहे. चांद्रयान मोहिमेची खिल्ली उडवल्याप्रकरणी प्रकाश राज यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हिंदू संघटनांच्या नेत्यांनी त्यांच्याविरुद्ध कर्नाटकमधील बागलकोट जिल्ह्यातील बनहट्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रकाश राज यांनी त्यांच्या ट्विटर हँडलवरुन इस्रोचे माजी प्रमुख के सिवन यांचे व्यंगचित्र शेअर केले होते. ज्यामध्ये के सिवन हे चहा ओतताना दिसतात. 'चंद्रावरून विक्रम लँडरने पाठवलेला पहिला फोटो, वॉव' असे म्हणत त्यांनी हे व्यंगचित्र शेअर केले आणि चांद्रयान-३ ची खिल्ली उडवली. त्यानंतर नेटकरी संतापले आणि त्यांना ट्रोल केले होते. द्वेष करणाऱ्यांना फक्त द्वेष दिसतो. मी आर्मस्ट्राँग टाईम्समध्ये प्रकाशित झालेल्या विनोदाचा संदर्भ देत होतो, जे आमच्या केरळच्या चहा विक्रेत्याचा आनंद साजरा करत होते. ट्रोल्सनी कोणत्या चहा विक्रेत्याला पाहिले? जर तुम्हाला विनोद समजला नसेल तर हा विनोद तुमच्यावर आहे, मोठे व्हा असे प्रकाश राज यांनी म्हटले आहे.

## कोयासन विद्यापीठाकडून फडणवीस यांचे आभार



आधुनिक केसरी न्यूज

**टोकियो :** महाराष्ट्र सरकारकडून कोयासन विद्यापीठाला भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा प्राप्त झाल्याबद्दल विद्यापीठाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले असून, त्यासाठी एक 'लेटर ऑफ ॲप्रिसिएशन' दिले आहे. कोयासन विद्यापीठाचे अध्यक्ष रे. सोईडा युंषो यांनी हे पत्र दिले असून, त्यात ते म्हणतात, 2015 मध्ये महाराष्ट्र सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कोयासन विद्यापीठाला दिला होता. तेव्हापासून दरवर्षी विद्यापीठात डॉ. आंबेडकर जयंती साजरी केली जाते. याबद्दल आम्ही त्यांचे अतिशय आभारी आहोत. भारत-जपान संबंध असेच वृद्धिंगत होत राहतील, अशा सदिच्छा सुद्धा त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# सरकार नामर्दासारखे वागत आहे

## कांदा प्रश्नावरुन आ. बच्चू कडू यांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : केंद्र सरकार केवळ सत्ता टिकवण्याचा विचार करत आहे. सरकार नामर्दासारखे वागत आहे. केवळ सत्तेसाठी ग्राहकाचा, खाणाऱ्याचा विचार केला जातो. मग पिकवणाऱ्या विचार का केला जात नाही. सरकारने ही नालायक वृत्ती सोडली पाहिजे, अशा घणाघाती शब्दांत आमदार बच्चू कडू यांनी मोदी सरकारवर प्रहार केला. कांद्यावर लादण्यात आलेले ४० टक्के निर्यातशुल्क आणि किरकोळ बाजारपेठेत कांद्याच्या वाढलेल्या दरावरुन सध्या राज्यात प्रचंड गदारोळ सुरु आहे. पिंपरी येथे 'दिव्यांग विभाग आपल्या दारी'या कार्यक्रमासाठी आलेल्या बच्चू कडू यांनी या सगळ्या परिस्थितीवर सविस्तरपणे भाष्य केले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार ताशेरे ओढले.**

ज्या लोकांना कांदा परवडत नसेल त्यांनी लसुण किंवा मुळा खाण्यात काही गैर नाही. केंद्र सरकार कांद्याचे दर वाढल्यावर हस्तक्षेप करते. मग भाव कमी झाल्यानंतर सरकार हस्तक्षेप का करत नाही?, असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला. काही दिवस कांदा खाल्ला नाही तर कोणी मरणार नाही. केंद्र सरकारला कांद्याच्या निर्यातीवर शुल्क लावण्याची गरज नव्हती. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये कांद्याचे भाव वाढू नयेत, यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करुन ठेवली आहे. सरकार इतका नालयाकपणा का करत आहे?



अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात कांद्याच्या भावावरुन सरकार पडले होते. पण त्यामुळे केंद्र सरकारने इतके घाबरण्याची काय गरज आहे? मोदीजी 'मेक इन इंडिया, मेड इन इंडिया'चा नारा देतात. मग या इंडियातील माल परदेशात कस जाईल, ही त्यांची भूमिका असली पाहिजे. कांदा परदेशात गेला तर त्याला सफरचंदाचा भाव मिळेल. त्यासाठी केंद्र सरकारने निर्यात धोरणात स्पष्टता आणली पाहिजे. तसे केल्यास आम्ही एकही जागा न मागता केंद्र सरकारला पाठिंबा देऊ, असे बच्चू कडू यांनी म्हटले. पुढे बोलताना कडू म्हणाले की, कोण काय बोलले यापेक्षा दिव्यांगाचे प्रश्न तुम्ही माध्यमांनी मांडावे. दिव्यंगाचे प्रश्न समोर आले पाहिजे. केंद्र सरकारने आयात निर्यात धोरणामध्ये केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. मी एक सीट न मागता आम्ही एनडीएला पाठींबा दिला आहे. पायात चप्पल न घालाता आम्ही फिरू असे देखील कडू म्हणाले आहेत. नवनीत राणा यांना धमकी आल्यानंतर ते काय एवढे महत्वाचे आहे का? मला देखील मारण्याची धमकी आली मग आम्ही काय म्हणायचे असा चिमटा देखील त्यांनी राणा यांना काढला.

### ही तर शेतकऱ्यांची दिशाभूल

कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्के करून कांद्याचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शेतकऱ्यांचा संताप पाहून घाबरलेल्या राज्य सरकारने केंद्र सरकारकडे धाव घेऊन नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदी करणार असल्याचे सांगत आहेत. नाफेडमार्फत कांदा खरेदी ही शेतकऱ्यांची दिशाभूल आहे. केंद्र सरकारने वाढवलेले ४० टक्के निर्यात शुल्क कमी का करत नाहीत? याचे उत्तर जनतेला द्या, अशी विचारणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

## कोल्हापुरात शरद पवारांची शुक्रवारी सभा


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भाजप-शिंदे सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अनेक आमदार पक्षातून बाहेर पडले व त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्राचा दौरा सुरू केला. या दौऱ्यांना मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते शरद पवार यांच्यासोबत असल्याचे दिसून येत आहे. पक्षाचे बांधणी करण्याकरिता आणि कार्यकर्त्यांमध्ये चेतना निर्माण करण्याकरिता महाराष्ट्रात आणखी दौरे आखण्यात येणार आहेत. कोल्हापुर येथे येत्या शुक्रवारी त्यांची सभा होणार आहे.

2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी मतदार आणि पक्षाच्या निष्ठावंतांशी सभेच्या माध्यमातून पवार संवाद साधत असल्याची घोषणा राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी पत्रकार परिषदेमध्ये म्हटले आहे. पवार यांच्या सभेला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या सभेची कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.



## उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

' पिंकी अग, खूप मोठं काम आहे बरं का राहीबाईंचं. त्यांच्या या कामाची भारत सरकारने दखल घेतली आणि त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार दिला गेला. राहीबाईंच्या सीड बँकेत ५३ प्रकारच्या पिकांचे ११४ गावरान वाण आहेत. आता नगरच्या अकोले तालुक्यासह चार तालुक्यातील पन्नास टक्के शेतकरी देशी वाणाची लागवड करतात ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. पुढच्या वेळी आपण सीड मदर राहीबाईंची सीड बँक बघायला आणि त्यांना भेटायला अहमदनगरच्या अकोले तालुक्यातील कोंभळणे गावी जाऊ या. ' ' अरे वा, बाबा. मला आणि राजेशला पण त्यांना भेटायला, त्यांच्याशी बोलायला आवडेल, ' पिंकी म्हणाली. एवढ्यात दारावरची बेल वाजली. राजेशने पळतच दरवाजा उघडला. पाहतात तो काय, श्यामरावांचे मित्र भगवानराव आले होते. भगवानरावांचे व्यक्तिमत्व प्रसन्न आणि कोणावरही पटकन छाप पाडणारे होते. राहणी साधीच पण टापटिपीची होती. भगवानराव एका महाविद्यालयात इतिहासाचे प्राध्यापक होते. ते एकदा बोलायला लागले की ऐकत राहावेसे वाटे. प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांचा अभ्यासाचा आणि आवडीचा विषय होता. बोलता बोलता ते छान गोष्टी, किस्से सांगायचे त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा कोणालाही कधीही कंटाळा येत नसे. ते आले की पिंकी आणि राजेशला प्रत्येक वेळी नवीन माहिती सांगायचे. त्यामुळे ते आल्याच्या आनंदात पिंकी आणि राजेशने टाळ्या वाजवल्या. श्यामराव म्हणाले, अरे भगवान, किती दिवसांनी येतो आहेस ! मुलांना पण तुझी आठवण येते. परवाच मुलं म्हणाली की कधीचे भगवानकाका आले नाहीत म्हणून.' ' काय रे तुम्ही मला न सांगता कुठेतरी गेलात आणि वर मलाच म्हणतो आहेस की खूप दिवसांनी येतो आहेस म्हणून ! शनिवारी मला इकडच्या बाजूला काम होतं तेव्हा मी तुझ्याकडे आलो होतो. पाहतो तर दरवाजाला कुलूप. शेजारी म्हणाले की ते सगळे कुठेतरी ट्रीपला गेलेत म्हणून. बरं तुझा फोनही नॉट रिचेबल होता. करायचं काय माणसानं ? ' भगवानराव जरा चिडलेच होते. तेवढ्यात श्यामलाताई बाहेरून आल्या. ' अय्या, भावजी तुम्ही. किती दिवसांनी येताय ! ' भगवानराव हसले आणि म्हणाले, ' वहिनी, मी येऊन गेलो आणि या श्यामला फोन सुद्धा केला. तुम्हीच कुठेतरी गेला होतात.आता याचा दंड द्यावा लागेल. ' ' हो रे बाबा, तू म्हणशील तो दंड देऊ आम्ही. अग, आधी या भगवानसाठी काही चहा पोहे वगैरे कर. त्याशिवाय काही हा भगवान प्रसन्न होणार नाही. '



समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

### चमकते ते सोनेच नसते

आधुनिक केसरी

आपण प्रत्यक्षांत जे नाहीत ते आहोत असे जगाला दाखवण्याच्या केविलवाणी प्रयत्नांत आपला अहंकार आणि दंभ वाढत असतो, त्यामुळे ती समजण्याची जाणीवच उरलेली नसते. मोठेपणाच्या अट्टाहासाने एक वेळ अशी येतेच कि, अनेक बाबतीत आपला अभ्यास कमी आहे आणि खोटेपणा लपवण्याची धडपड सुरु आहे हे स्पष्ट होते. निर्माण केलेला अभास हा फार काळ टिकत नसतो, हे न समजणे हीच खरी उणिव असते. अभासाचा विपरीत परिणाम काहीवेळा काही विवाहांच्या पश्चात घडून आल्याचे आपल्याला समजते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विवाह निश्चित करताना ग्लॅमर नाही, तर ग्रामर महत्वाचं असतं; केवळ दिखाऊपणा, आभास नाही तर अभ्यास महत्वाचा ठरतो. तिथेदेखील सुरुवातीचा आभास कितीही प्रभाव निर्माण करणारा असला, तरीही कालांतराने प्रभावापेक्षा मूळ स्वभाव आणि एकूणच अभ्यासातील अभाव दिसून येऊ लागतो. सुरुवातीला चमकणारे सोने कालांतराने तांबे असल्याचे कळले कि अभ्यासाचा अभास केल्याचे पितळ उघडे पडते. पवित्र मानल्या जाणाऱ्या, विवाहाच्या संस्कारांतून निर्माण होणाऱ्या नात्यासाठी काहीवेळा वधू-वर यांच्या निवडीत देखील अभ्यासाचा अभाव असल्याचे दिसून येते. संपूर्ण आयुष्य सहजीवनाच्या मार्गाने व्यतीत करायचे असते, हे सर्वज्ञात असूनही अवघ्या काही तासांत विवाह निश्चित केले जातात. काहीवेळा अभ्यासाचा अभाव, तर काहीवेळा अभास असल्याचे कळते पण वळत नाही. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आभासी दुनियेचे आकर्षण फार नसावे कारण नेहेमी अभ्यासच महत्वाचा ठरत असतो. करिअरची निवड करण्यासंबंधीचा सखोल अभ्यास केला नाही आणि केवळ आभासाला भुलून निर्णय घेतला तर, त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.



आधुनिक केसरी

**भक्त ऐसा थोर | भवानीचा ||**

जिजाऊचा शिवा | भवानीचा भक्त ||
स्वराज्य सशक्त | उभारिले ||१||
तलवार रूपी देऊनी प्रसाद
मोडीला उन्माद | दुर्जनांचा ||२||
कवड्याची माळ | शोभली कंठात ||
गोंधळ घालीत | प्रगटला ||३||
कुलवंत योगी | शोभिवंत राजा ||
श्वास ज्याची प्रजा | धन्य शिवा ||४||
निश्चयाचा मेरू | शंभु अवतार ||
भक्त ऐसा थोर | भवानीचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


पादपद्मनि ते देवि मे चित्तमस्तु सर्वदे |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
७२ || हे देवी, हे सर्वदे, तुझ्या चरणकमली माझे चित्त सदा असो. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जिवन्मुक्ति प्रभु मिलन है,
भक्ति सत्य सोइ जान ।
धोखा सर्व विडम्बना, भक्ति सन्त परधान
।।२८।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/२८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जिच्या द्वारे जीवन्मुक्ती आणि प्रभु प्राप्ती होते, तीच संतांची श्रेष्ठ, सत्य भक्ती आहे. या व्यतिरिक्त सर्व धोका, भ्रमजाल आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी



भक्त एकदा का भगवंताशी एकरूप झाला की भक्त आणि भगवंत "मी" पणाने पून्हा वेगळे होऊ शकत नाहीत. एकदा का ब्रम्हपदाला पोहचला की तिथे वेगळे पणाला जागा रहात नाही. ऊदा, एकदा का नदी सागराला मिळाली की तिचें वेगळेपणं करता येत नाही. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला की ते परत पून्हा काळे पडत नाही. तसाचं देव व भक्त एकरूप झाल्यावर वेगळे होऊ शकत नाहीत. देव व भक्त हे दोन नसल्याचे ज्या साधकाला समजते, अशा साधकाला त्याचा विचार मोक्षापर्यन्त नेतो. देहबुध्दि जो पर्यन्त जागी असते तोपर्यंत भक्ति होऊचं शकत नाही. त्यासाठी देहातीत होणे अवश्यक आहे. परब्रम्हाचा लाभ घ्यायचा असेल तर देहाच्या पलीकडे गेले पाहिजे. देहातीत कसे व्हायचे.. मी देह आहे ही भावना सोडली की विदेहीपणाचे ऐश्वर्यसंपन्न होता येते. सगळ्यात महत्वाचे मी देह आहे ही भावना आहे जोपर्यन्त तोपर्यंत अधोगति काही चुकतं नाही. म्हणून सतत संतांच्याच संगतीत रहावे.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंत सगुणात आले म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, "हिंदू धर्मासारखा धर्म नाही; पण देव सगुणात आले हे नाही मला कबूल. म्हणे निरनिराळ्या उपासना सांगितल्या ! देव जर निर्गुण निराकार, तर राम, कृष्ण, शिव, दत्त अशा या एवढ्या निरनिराळ्या उपासना कशाला ?" पुढे एक दिवस त्यांच्याविषयी एका गृहस्थाने त्यांच्या घरी चौकशी केली, तेव्हां प्रत्येकजण निरनिराळे नाव घेऊन सांगू लागले. कोणी 'दादा' घरी नाहीत असे म्हणाले, तर कोणी 'दामोदर' घरी नाही म्हणाले, कोणी 'रावसाहेब' नाहीत म्हणाले. हे सर्व जरी म्हटले तरी त्या योगे भेटणारा मनुष्य ज्याप्रमाणे तो गृहस्थ एकच, त्याप्रमाणे हे भगवंताच्या निर्गुणाचे सगुणात आले. भगवंत सगुणामध्ये आला की, जे नियम आपल्याला लागू असतात तेच नियम त्यालाही लागू होतात. सगुणाशिवाय निर्गुण उपासना करतो म्हणतो, त्याला त्याचे मर्मच नाही कळले. खरी तो सगुण उपासनाच करीत असतो, पण त्याला नाही ते कळत. आपले वेद, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, आणि त्यावरची भाष्ये यांनी निर्गुण स्वरूपाची रूपरेषा काढून दिली. संतांनी तिच्यामध्ये रंग भरला आणि भगवंताचे सुंदर चित्र तयार केले; ही सगुणभक्ति होय. सगुणोपासनेवाचून मोक्ष मिळणार नाही. उपासना याचा अर्थ अगदी निकट असणे, उपास्याचा गुण अंगी आणणे. तुळशीदासांनी रामोपासना अशी केली की ते स्वतः रामरूप बनले. तुळशीदासांचे रामायण ऐकत असता मनुष्य तल्लीन होऊन जातो. रामरूप होण्यासाठी रामासारखे निःस्वार्थी बनले पाहिजे. रामाने 'जग माझ्याकरिता आहे' असे न म्हणता, 'मी जगाकरिता आहे' असे म्हटले. हा खरा परमार्थ. एकपत्नीव्रत, सत्यभाषण हे रामाचे दोन प्रमुख गुण होते. इतर अवतारातही महत्त्वाच्या गोष्टी आहेत, परंतु सर्वांत रामचरित्र प्रापंचिकांना अत्यंत आदर्शरूप आहे. रामचरित्र सर्वांना सर्वकाळी आदरणीय आणि अनुकरणीय होय. रामचरित्र वाचताना, सांगताना अथवा ऐकताना, आपण रामप्रेमात स्वतःला विसरून जाणे ही फार उच्च अवस्था होय. भगवंत हवासा वाटणे यामध्ये सर्व मर्म आहे. भगवंत हवासा वाटणे किंवा त्याची तळमळ उत्पन्न करणे हे भगवंताच्या हाती नाही, ते संतांच्या हाती आहे; म्हणून सत्संगतीने ते साधते. 'साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा' असे आपण म्हणतो. संत दसरा आणतात, मग दिवाळी आपोआप मागे येते. आमची वृत्ती विषयाकार झालेली आहे, ती काढून संत सन्मार्गाला लावतात, तोच खरा मुहूर्त की ज्या दिवशी आमची वृत्ती भगवंताकडे होऊ लागली.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

प्रपंचात कर्तव्य पालन ,वृत्तीचा संयम ,सद्गुरुंशी अन्यन्य शरणागती हेच परमेश्वर प्राप्तीचे (साधनेचे ) सुलभ व खात्रीशीर साधन आहे.त्रेतायुगाचे चालक मालक ,पालक,श्री विष्णू /सत्य युगाचे श्रीराम / द्वापारयुगा चे श्री कृष्ण /तर कलियुगाचे श्री स्वामी समर्थ म्हणजेच गुरु महाराज आहेत. तेव्हा आपल्याला कोणी गुरु भेटले नाहीत म्हणून दु;खी कष्टी न होता मनोमन त्यांची प्रार्थना सुरु करावी त्यांचा ध्यास धरावा कि जे कोणी परम पुरुष माझे गुरु आहेत त्यांनी यावे व मला दर्शन द्यावे व मला अनुग्रहित करून घ्यावे .हि तळमळ का एकदा सुरु झाली कि गुरु आपल्या सनीध्य आल्याशिवाय राहणार नाहीत. अंतकरणापासून आपल्या गुरूस हाक मारावी म्हणजे ते निश्चित येतील व कल्याण करतीलच. एकदा ठाम विचार करून आपण ज्याला गुरू कल्पिला, तो सांगेल तेच साधन मानावे. गुरू देहातच असावा हे मानणे चूक आहे. गुरू हे देहात कधीच नसतात. गुरू प्रत्यक्ष देवच आहे अशी भावना ठेवून वागले पाहिजे. अशी भावना ठेवून वागले.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

मनस्येकं वचस्येकं कायें चैकं सदात्मनाम् ।
मनस्यन्यद्वचस्यन्यत् कार्येचान्यद् दुरात्मनाम् ॥
– स्पष्टीकरण : म्हणजे सज्जन भरवशाचे असतात आणि दुर्जन बेभरवशी असतात. म्हणून तुकोबांनी दोन अभंगपंक्ती लिहून ठेवल्या आहेत. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले ।
आणि 'सर्प विनू नारायण परी बंदावे दुरून ।

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २३ ऑगस्ट २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# सदगुरु गंगागिरी सप्ताहाला पहिल्याच दिवशी दीड लाखावर भक्तांची उपस्थिती

## मांडे व पुरणपोळी वीस हजार लिटर दूध व ७० क्विंटल भात असा महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** सरला बेटचे सदगुरु गंगागिरी महाराज यांच्या १७६व्या अखंड हरिनाम सप्ताह शुभारंभ दिनी दीड लाखावर भाविक -भक्तांची उपस्थिती होती. मठाधिपती हभप रामगिरी यांची रथातून संकट मोचन मंदिर येथून भव्य मिरवणूक काढण्यात आली. डी.जे. वाद्य, बँड पथक, आध्यत्मिक पारंपरिक वाद्य, लेझीम पथक, मुलींचे पथक, झांज पथक,वारकरी संप्रदाय, भजनी मंडळ, कलशधारी महिला, बैलगाडीवर सनई वाद्य व शेवटी रथात महाराज अशीभव्य दिव्य न भूतो न भविष्यती ही मिरवणूक अडीच किलोमीटर लांब सप्ताह स्थळी पोहचण्यास तीन तास लागले. रस्त्याच्या दुतर्फा अफाट गर्दी महाराजांच्या स्वागतास, दारावर रांगोळी व घरावर गुढ्या उभारून या अडीच की, मी,लांब जाणाऱ्या मिरवणूकीचे सदगुरू गंगागिरी महाराज की जय सदगुरू नारायण गिरी महाराज की जय अशा जयघोषात स्वागत केले. कार्यक्रमस्थळी यज्ञपूजन झाल्यावर हभप रामगिरी महाराज यांनी १६८ तास अखंडपणे चालणाऱ्या अखंड प्रहर स्थानी सरला बेटचे सर्व संत यांच्या प्रतिमांचे पूजन केले. तद्नंतर अखंड हरिनाम सप्ताह समितीचे अध्यक्ष आ. रमेश पा. बोरनारे, उपाध्यक्ष साबेरखान,कार्याध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती, माजी आ. सुभाष झाम्बड, सचिव बाबासाहेब जगताप, नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, सदस्य राजेंद्र पा. साळुंके, पारस घाटे, लिमेश वाणी, प्रतापराव निंबाळकर, कल्याण डांगोडे, दिनेश राजपूत, भगवान तांबे, सजनराव



गायकवाड,उमाकांत ठोंबरे, शेख अखिल, मस्जिद कुरेशी, अरुण भालेकर, विशाल संचेती, संजय बोरनारे, रणजित चव्हाण यांनी महाराजांचे पूजन केले. महाराजांच्या अमृत वाणीतून पांच अभंग झाल्यानंत, महाराजांच्या अमृत वाणीतून सदगुरू अखंड हरिनाम सप्ताह शुभारंभ झाल्याचे जाहीर झाले. या मिरवणूकीचे नियोजन व सूत्र संचलन आ.रमेश पा. बोरनारे यांच्या मार्गदर्शनाखाली धोंडीरामसिंह राजपूत यांनी राजेंद्र पा. साळुंके, पारस घाटे, बाबासाहेब जगताप यांनी केले. हभप रामगिरी महाराज यांनी सप्ताह शुभारंभ झाल्याचे सांगितल्या नंतर उपस्थित दीड लाखावर भक्त भाविकांना वैजापूर शहर व पंचक्रोशीतिल तसेच गंगापूर तालुका, येवला तालुका, नांदगाव नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातून भक्त भाविकांनी आणलेला मांड्याचा व पूरण पोळी प्रसाद प्रदान करण्यात आला. वीस हजार लिटर दुध व ७० क्विंटल भात महाप्रसाद संध्याकाळी भाविकांना सप्ताह स्थळी प्रदान करण्यात येत आहे. आयोजक आ. रमेश पा. बोरनारे यांनी सर्वांचे आभार मानत पूर्ण आठ दिवस सहकार्य करण्याचे आवाहन केले.

### आधुनिक केसरी अभीष्टचिंतन सोहळा

# शोषित, वंचित समाज बांधवांसाठी झटणारे समाजसेवक सचिन इप्पर

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, बिरसा मुंडा आणि आध्यात्मिक गुरु संत सेवालाल महाराज, बसवेश्वर महाराज, संत भगवान बाबा आदी संतमहात्म्यांच्या विचारांशी बांधील राहून, राजकारणातून समाजकार्य करण्याची प्रचंड ताकद आणि आत्मविश्वास असलेले सचिन इप्पर हे रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा आमदार अमित झनक यांचे अगदी जवळचे व विश्वासू सहकारी म्हणून संपूर्ण वाशिम जिल्ह्यात ओळखले जातात. आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात अनेक पदांच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणारे, इप्पर आज अखिल भारतीय वंजारी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव म्हणून खंबीरपणे जबाबदारी सांभाळत आहेत. दिनांक २३ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन त्या अनुषंगाने त्यांचे अभिष्टचिंतन करताना त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा आधुनिक केसरीने घेतलेला हा संक्षिप्त आढावा.

***चमक सचिन की नहीं, उनके किरदार की है !***
***खबर ये आसमाँ के अखबार की है !***
***सचिन चले तो उनके संग कारावां चले..***
***बात गुरुर की नहीं, ऐतबार की है..!!***

आपला मनमिळाऊ स्वभाव, सुसंस्कृत वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले सचिन तुकाराम इप्पर या ध्येयवेड्या तरुणाने शालेय जीवनापासूनच समाजसेवा करण्याचा ईरादा ठाम केला होता. संघटन कौशल्याची दैवीशक्ती लाभलेले इप्पर यांनी त्यांच्याशी संपर्कात आलेल्या प्रत्येक युवकाला आपलेसे करून घेतले. केवळ गर्दीत सामील होऊन हुल्लडपणा करणाऱ्या अनेक युवकांत त्यांनी विधायक कार्य करण्याची आवड निर्माण केली. म्हणूनच, आज त्यांच्या अवतीभवती असंख्य युवा कार्यकर्त्यांची फौज निर्माण झाली आहे. त्याच कार्यकर्त्यांच्या बळावर



वसंत खडसे
9373578429

त्यांनी केवळ आपल्या चिंचाबा ( भर ) सर्कल मध्येच नव्हे; तर रिसोड तालुक्यातील खेडोपाडी जाऊन आपल्या राजकीय पक्षाची ध्येय धोरणे आपुलकीने व प्रेमाने अखेरच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. आणि जमेल तेवढी मदत देखील केली आहे. सन २०१४ मध्ये वंजारी सेवा संघ युवा आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष पदाच्या नियुक्ती पासून त्यांनी आपल्या समाजसेवेची सुरुवात केली. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची चमक पाहून आपसूकच त्यांना सन २०१७ मधे अखिल भारतीय वंजारी युवक संघटनेच्या प्रदेश संघटक पदी बढती मिळाली. सन २०१८ मधे युवक काँग्रेसच्या विधानसभा महासचिव पदी ते निवडून आले. आणि येथूनच त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. पुढे २०२२ मधे झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत सचिन इप्पर यांनी आपल्या आईला उमेदवार करून, राजकीय भाग्य आजमावण्याचा प्रयत्न केला, परंतु राजकारणात अगदी नवखे पदार्पण असताना सुद्धा त्यांना केवळ ८२ मतांनी विजयाने हुलकावणी दिली. मात्र सचिन यांनी न डगमगता राजकारणातून समाजकारण करण्याचा आपला वसा जरासुद्धा ढळू दिला नाही. पक्षाने त्यांची जिद्द व चिकाटी पाहून २०२२ मधे युवक काँग्रेस जिल्हा महासचिव पदावरून थेट महाराष्ट्राच्या प्रदेश सचिव पदावर त्यांची नियुक्ती केली. तर सामाजिक संघटनेकडून त्यांना वंजारी युवक संघटनेची प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली.

सचिन इप्पर यांच्या सामाजिक जीवन कार्याचा आढावा घेताना प्रकर्षाने जाणवते की, आई नंदाबाई इप्पर आणि वडील तुकाराम इप्पर यांनी सचिनवर समाजशीलतेचे संस्कार तर केलेच; पण त्यांना घडवण्यामधे संतमहात्म्यांच्या विचारांचेही खूप मोठे योगदान आहे. म्हणूनच कोरोना सारख्या महामारीच्या काळात सुद्धा त्यांनी खूप मोठे सेवाकार्य केले होते. आणि आजही ते शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या श्रावण बाळ, संजय गांधी निराधार आदी योजनांचा फायदा तळागाळातील गोरगरीब लाभार्थ्यांना मिळावा म्हणून, नेहमी प्रयत्नशील असतात. आयुष्यातला प्रत्येक क्षण समाजोत्थनासाठी केंद्रित करणाऱ्या सचिन इप्पर यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करावा तेवढा कमीच आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण वाशिम जिल्ह्यातून होणाऱ्या अभिनंदन वर्षावात दैनिक आधुनिक केसरी सुद्धा सहर्ष सहभागी आहे..!





# G-20 परिषद संपली अन् रस्ते झाले अनाथ

## अँब्युलन्स हेल्प रायडर्सने हाती घेतली खड्डा बुजवा मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मागच्या अनेक दिवसापासून आपण सर्वजण बघत आहोत जालना रोडवर सेव्हन हिल चौकातील गजानन मंदिर कडे जाताना डाव्या बाजूला ३ ते ४ मोठे जिवघेणे खड्डे झालेले आहेत व आता पावसाळ्यात त्याच खड्डयात पाणी साचून रात्री हे खड्डे वाहन चालकांना दिसेनासे होत आहेत व यामुळे अनेक वाहनचालकांचे अपघात होत असताना प्रशासन मात्र यावर काही उपाययोजना करायला तयार नाही. एकंदरीत शहरातील रस्ते अनाथ झाल्याची भावना व्यक्ति होत आहे. त्यामुळे प्रशासनाची वाट न पाहता अँब्युलन्स हेल्प रायडर्स या सामाजिक संस्थेने आज दि 22 ऑगस्ट रोजी पुढाकार घेतला त्यात त्यांना नाथ सीड्स कंपनी मधील श्री संतोष जोशी यांनी हे भले मोठे खड्डे बुजवण्यासाठी लागणारे सर्व साहित्य हेल्प रायडर्स ला ऊपलब्ध करून देत सहकार्य केले.

सर्व हेल्प रायडर्स ने आज स्वतः सकाळी ७ वाजता श्रमदान करत या सेवन हील चौकातील ३-४ मोठे खड्डे भरती, मुरूम व खडी टाकत तात्पुरत्या स्वरूपात बुजवले. यावेळी अँब्युलन्स हेल्प रायडर्स संस्थेतील अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते यात महिला व वृध्द हेल्प रायडर्सचा सुद्धा सहभाग मोठा होता व या उपक्रमाच्या माध्यमातून एक संदेश हेल्प रायडर्स ने शहरातील नागरिकांना दिला आहे की प्रशासन कधी करेल याची वाट न पाहता आपण सुजाण नागरिक म्हणून पुढे येत अशी जनहिताची काम करावी व आपल्या जनतेचा त्रास कमी करावा.. या ऊपक्रमात संस्थेचे सदस्य भूषण कोळी प्रसाद कस्तुरे, शामसुंदर देशपांडे, मुकेश गाडेकर, संदीप कुलकर्णी,रजनी नागवंशी, आनंद सावदेकर, शारदा पडवळे, मीनल घुमरे, किरण शर्मा, दीपक साळवे, पवन भिसे, देवा मनगटे, ज्ञानेश्वर डोळे आदी ऊपस्थित होते.

# जिंतूर तालुक्यामधे मुन्नाभाईंचा सुळसुळाट

## आरोग्य विभाग गाढ झोपेत? मग कारवाई कोण करणार!

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यात बोगस मुन्नाभाई डॉक्टरांचा सुळसुळाट! आणि त्यासोबतच क्लिनिक लॅबचाही बोलबाला झालाय! याआधी पत्रकारांनी बोगस मुन्नाभाई डॉक्टरांचा पर्दाफाश केला होता! त्यानंतर आरोग्य विभागाने 40 हून अधिक बोगस मुन्नाभाई डॉक्टरांवर पोलीस कारवाई करत त्यांच्यावर गुन्हे दाखल केले! मात्र कारवाईचे प्रसंग संपताच बोगस मुन्नाभाई डॉक्टरांनी पुन्हा आपले बस्तान बसवले आणि बोगस वैद्यकीय व्यवसाय सुरू केला! आजही तो मुन्नाभाई डॉक्टर खुलेआम प्रॅक्टिस करतोय! आणि आता बोगस क्लिनिक लॅब चालकांनी रक्त लघवी, शुगर, टेस्ट क्लिनिक लॅब सुरू केल्या आहेत! शहरात क्लिनिक 20 ते 22 लॅब सुरू! ज्यामध्ये 5ते 6 लॅब चालकांकडे महाराष्ट्राच्या पॅरामेडिकल कौन्सिल, मुंबईचे नोंदणीकृत व्यावसायिक प्रमाणपत्र आहे. या बोगस मुन्नाभाई लबचकांनी पैसे कमवण्यासाठी पावसाळ्यात कुत्र्यांसारखी छत्री वापरलत रुग्णांच्या जीवाशी खेळ मांडला आहे. बोगस मुन्नाभाई लॅबचालकाच्या अहवालावरच हे डॉक्टर पेशंटवर उपचार करतात! शहर आणि तालुक्यात बोगस मुन्नाभाई डॉक्टर आणि बोगस मुन्नाभाई लॅब चालकांची कमतरता नाही. त्यांच्यावर कोण कारवाई करणार? हे बोगस मुन्नाभाई डॉक्टर आणि बोगस मुन्नाभाई लॅब चालक सामान्य जनतेची आर्थिक लूट करत आहेत! बोगस मुन्नाभाई डॉक्टर, लॅब चालकांच्या अहवालावर चुकीचे उपचार देऊन ते रुग्णांच्या आरोग्याशी खेळत आहेत! या प्रकरणी महाराष्ट्र पॅरावैद्यकीय कौन्सिल, जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे या मुन्नाभाई वबोगस लॅब चालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# धक्कादायक अहवाल

आधुनिक केसरी

करोनाच्या दृष्टचक्रातून अवघे जग हळूहळू बाहेर पडत असताना एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. करोनातून बरे झालेल्या ज्या रुग्णांना पोस्ट कोविडचा त्रास झाला त्यांच्या मृत्यूची शक्यता तीन पटीने वाढली असल्याचा निष्कर्ष भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (ICMR) काढला आहे. तसंच, करोनाची लागण झालेल्या ६.५ टक्के मध्यम ते गंभीर रुग्णांचा वर्षभरात मृत्यू झाल्याचाही निष्कर्ष काढण्यात आला आहे. ३१ रुग्णालयांमधील १४ हजार ४१९ रुग्णांच्या संशोधनातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या रुग्णांवर वर्षभर फोनद्वारे देखरेख ठेवली गेली होती. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. सप्टेंबर २०२० पासून रुग्णालयात दाखल झालेल्या १७.१ टक्के रुग्णांना पोस्ट कोविडचा त्रास झाला आहे. करोनातून बरे झाल्यानंतर चार आठवड्यात थकवा, श्वास घेण्यास अडचण, धाप लागणे, एकाग्रता मंदावणे अशी लक्षणे आढळल्यास पोस्ट कोविडची स्थिती निर्माण होते. हा अभ्यास मध्यम ते गंभीर स्वरुपाच्या रुग्णांच्या मृत्यूशी संबंधित आहे. ज्यांना अल्प स्वरुपाचा संसर्ग झाला आहे त्यांना हा निष्कर्ष लागू होणार नाही, असे आयसीएमआरशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, करोनासह इतर आजार असलेल्या (सहव्याधी) रुग्णांमध्ये कोविड मृत्यूचा धोका संभवतो. याचा अर्थ यकृत सिरोसिस आणि किडनीच्या आजाराच्या लोकांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. कोरोना संसर्गामुळे दीर्घकाळ जळजळ, अनेक अवयवांचे नुकसान, फुफ्फुसाचे बिघडलेले कार्य यामुळे हे मृत्यू झाले असावेत असेही या अभ्यासात म्हटले आहे. करोना संसर्ग हळूहळू हद्दपार होतोय असे वाटत असतानाच नव्या व्हेरियंटची जगाची चिंता वाढवली आहे. EG.5 हा नवा कोरोनाचा प्रकार आढळला असून ५० हून अधिक देशांमध्ये याचे रुग्ण आढळले आहेत. तर, BA.2.86 या प्रकाराचेही रुग्ण चार देशांमध्ये नोंदवले गेले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचे प्रधान सचिव पीके मिश्रा यांनी सोमवारी उच्चस्तरीय कोविड-१९ आढावा बैठक घेतली. "सार्वजनिक आरोग्य यंत्रणेने सज्ज राहिले पाहिजे आणि राज्यांना इन्फ्लूएंझा सारख्या आजारांच्या प्रकरणांचे निरीक्षण करा, असे निर्देश केंद्रीय आरोग्य सचिव सुधांशू पंत यांनी बैठकीत दिले.



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

# मंत्री भुजबळांच्या अंगात ब्राह्मण तिटकारा का ?

आधुनिक केसरी

**चालेना कुठं अन् बडवले भट अनेक वर्षापासुनची म्हण असुन स्वअस्तित्व निष्क्रियतेकडे जात असेल तेव्हा कुजलेली मानसिकता ज्यांच्या डोक्यातुन उल्लेख केलेल्या वाक्याप्रमाणे कृती घडते. तसंच काही अधुनमधुन राज्याच्या वर्तमान राजकारणात पहायला मिळत असुन थेट जातीय द्वेष करत गरळ ओकायची आणि ब्राह्मणाला टार्गेट करायचे. मंत्री छगन भुजबळांनी द्वेषाचे विष बाहेर ओकताना काय तर म्हणे ब्राह्मणांत शिवाजी, संभाजी नावे ठेवली जात नाहीत. सामाजिक समतेचा डांगोरा पिटवत ऐक्याची भाषा आणि पुरोगामी विचार ज्यांच्या नसनसात भरल्याचा आविर्भाव आणतात अशीच माणसं संवैधानिक पदावर असताना द्वेषाची गरळ का ओकतात?हा प्रश्न आता सर्वांना पडतो.**

जातीपातीच्या चष्म्यातुन राजकारण करणारे टक्केवारीतच केवळ ब्राह्मणाला मोजतात हा अहंकार देखील वर्तमान समाज व्यवस्थेत धोक्याचा होवु शकतो. सरस्वतीची पुजा तुम्हाला मान्य नसेल पण ज्ञानाच्या मंदिरात दिवा लावु सरस्वतीचा यासारख्या कविता तत्कालीन काळात सावित्रीबाई फुलेंनी केलेल्या असताना त्या कधी सरस्वतीचं पुजन करत नव्हत्या हा जावाईशोध भुजबळ लावतात. याचाच अर्थ त्यांनी फुले दांपत्याचा इतिहास वाचला नसावा. शिवाय तुमच्या घरात कुणाचं नाव ज्योतीबा किंवा सावित्रीबाई असल्याचा दाखला अगोदर द्यायला हवा. हे तुम्हाला जनता विचारत आहे. राज्याचे अन्नपुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांना समता परिषदेचे संस्थापक आणि ओबीसी नेते म्हणुन ओळखले जातात. वर्षानुवर्षे काळापासुन ओबीसीच्या प्रश्नावर लढणारा एक सैनिक अशी त्यांची ओळख. राजकारणात त्यांनीही वेगवेगळ्या पक्षात उडीमार राजकारण केलं तो भाग वेगळा. एकेकाळी प्रखर हिंदुत्व नसनसात असताना तत्कालीन काळात प्रसंगानुसार प्रखर पुरोगामी धर्मनिरपेक्षता तदनंतर पुन्हा हिंदुत्ववाद्याची मांडी असं त्यांचा राजकिय प्रवास. फुलेंचे वारसदार आपणच असल्याचा आविर्भाव त्यांच्या डोक्यात नेहमीच असतो. वैधानिक पदावर तेही मंत्री म्हणून शपथ घेतलेला व्यक्ती आपल्या तोंडून जातीय द्वेषाची भाषा करत असेल तर मग खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाही म्हणावी का? मंत्रीच जर जातीपातीचं राजकारण करत असतील असे अनेक प्रश्न त्यांच्या भुमिकेतुन पहायला मिळतात. मागच्या वर्षीसुद्धा सरस्वतीची पुजा करू नका असे खुले आवाहन त्यांनी केले होते. वास्तविक पहाता सावित्रीबाई फुले स्वतःच सरस्वती पुजक होत्या. त्यांनी काव्यात्मक काही लिखाण केलं त्यात चला जावु ज्ञानाच्या मंदिरात, सरस्वती अशा शब्दांचा उल्लेख आढळतो. सांगायचं तात्पर्य भुजबळासारखी माणसं सरस्वतीची पुजा करू नका असं सांगतात हे दुर्दैव म्हणावे लागेल. दुसरी गोष्ट काल परवा त्यांनी कहरच केला. काय तर म्हणे ब्राह्मण वर्गात संभाजी, शिवाजी नावे नसतात. शिवाय टक्केवारी हा शब्द त्यांच्या तोंडून विषासारखा बाहेर पडतो. प्रश्न असा आहे की, एखादा मंत्री किंवा राजकिय पक्षाचा जेष्ठ नेता जेव्हा टक्केवारीची भाषा करतो तेव्हा मंत्रीपदाची शपथ घेतानाचे केवळ नाटक आहे का? असंही म्हणता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे ओबीसीचं नेतृत्व आपणच करतो तर मग इतर समाजाची अवहेलना जाहिरपणे करायची. त्यांना हे पण सांगितले पाहिजे की ब्राह्मण कुळाचा आणि समाजाचा खरं तर अभ्यास आणि इतिहास वाचायला हवा. या राज्यात आणि देशात किती टक्के ब्राह्मण यावर भलेही तुमचं राजकारण चालत असेल शिवाय कुठला समाज किती आहे? हे एखाद्या मंत्र्यानं शोधुन काढणं बरे नव्हे. ब्राह्मणामध्ये खरंच शिवाजी आणि संभाजी अशी नावे कितीतरी पहायला मिळतील. पण तुम्ही ज्यांचं पाईक आणि वारसदार समजतात त्या ज्योतीबा फुलेंचं किंवा सावित्रीबाई फुलेंचं एखादं तरी नाव तुमच्या रक्ताच्या नात्यात आहे का? ना भाऊ ना बहिणी ना पुतण्या ना पणतु अगदी समीर, अशी गोंडस नावं. आपलं ठेवायचं झाकुन, दुसऱ्याचं बघायचं वाकुन ही राजकिय निती योग्य नाही. ब्राह्मण आणि ब्राह्मणाचा



इतिहास ज्याची कर्तबगारी कालानुरूप सर्वांना माहिती आहे. अगदी स्वातंत्र्याची लढाई असेल किंवा स्वातंत्र्यपुर्व काळात शिवकालीन लढाया असतील यात ब्राह्मणाचं असलेलं योगदान भुजबळांनी एकदा तरी डोकावुन बघायला हवं. बाजीप्रभु, थोरले बाजीराव, पेशवे या नावावर नजर जरी टाकली तरी भुजबळ साहेब तुमच्या अंगाला थरकाप येईल. नंतरच्या काळात देशासाठी प्राण त्याग ज्यांनी केला ते मंगल पांडे, इथपासुन सावरकर म्हणा किंवा लोकमान्य टिळक म्हणा यांच्या शौर्याचा इतिहास तुमच्या तोंडी कधीच येत नाही हेच खरं भारतीय लोकशाहीचं दुर्दैव. दिड टक्याची बिरूदावली मात्र या वयातही तुमच्या तोंडी बसते यावरून तुमच्या मनाचा कोतेपणा आणि ब्राह्मणाविषयी तुमच्या ऱ्हदयात किती द्वेष हे पहायला मिळतं. आम्ही तर सरस्वतीचे पुजक आहोतच पण सरस्वतीपुजन हे जातीपातीवर आधारीत नव्हे तर भारतीय रूढी परंपरा, संस्कृतीचं ते मांगल्य आहे. अगदी वैज्ञानिक दृष्टीकोनातून बोलायचं झालं तर धन्वंतरीच्या दरबारात देखील सरस्वती पुजन पहायला मिळतं. विद्येच्या दरबारात ते तर साहजिकच म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर सावित्रीबाई फुल्यांना सुद्धा ज्ञान दिव्याची ज्योत प्रकाशित करताना सरस्वती पुजनाचे अनेक दाखले देता येतील ज्यावर त्यांचं काव्य प्रचित आहे. पण अधुनमधुन भुजबळासारख्या सामाजिक द्वेषाच्या राजकारणात टक्केवारीच्या नावाने ब्राह्मण द्वेषाची बीजे रोवली जातात. यावरून तुम्ही किती आदर्शहीन वागतात? सिद्ध होते. शिवाय तुमच्याकडून नव्या पिढीने आदर्श तरी काय घ्यायचा? दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही ज्या मतदारसंघात निवडणुका लढवता तिथे असंख्य ब्राह्मणांनी आयुष्यात तुम्हाला राजकिय मदत केली हे तुम्ही विसरलात. पण एक गोष्ट लक्षात भुजबळांनी घ्यायलाच हवी की वारंवार आपण ब्राह्मण द्वेषाची गरळ ओकतो त्याचे परिणाम कधी भोगावे देखील लागतील. अजुन एक महत्वाचा प्रश्न मला पडतो, तो म्हणजे भुजबळ हे फुलेंच्या नावाखाली ब्राह्मणाला टार्गेट का करतात? सुक्ष्म नजरेतुन या भुमिकेचा शोध घेतला तर जेव्हा इतर जातींमध्ये बोलण्याची हिंमत होत नाही किंवा कुणाला अंगावर घेण्याची हिंमत होत नाही अशा वेळी चालेना कुठं अन् बडविले भट या प्रयोगाचा भुजबळासारखे अनेक राजकिय नेते म्हणा किंवा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे विचारवंत म्हणा करताना दिसतात. परजातीला द्वेषातुन पहाणे आणि आपण कसे श्रेष्ठ आहोत? असं दाखवण्याचा विचार जोपासणे अशी माणसं खऱ्या अर्थाने सामाजिक क्षेत्रात घातकच असतात असं म्हणायला वाव निश्चित मिळतो. वारंवार नाही म्हटलं तरी वर्षातुन एकदा दोनदा भुजबळांच्या तोंडून जातीय द्वेषाचं विष बाहेर पडतं. तेव्हा मात्र राजकारण कुठल्या स्तराला जावु शकतं याची कल्पना येते. केवळ टक्केवारीनं कमी आहोत म्हणून ब्राह्मण समाजाचा गुन्हा आहे का? यापेक्षा तुम्ही टक्केवारीच्या नजरेतुन पहाता हाच खरा गुन्हा तुमच्याकडून घडतो असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही आणि जेव्हा इतर समाजाबाबत कुणाचं कुठं काही चालुच शकत नाही. मग केवळ कमी टक्केवारीचा शोधायचा आणि मानसिक रूग्ण असल्यासारखं बदडायचं ही वैचारिक पातळी वर्तमानकाळात फुले दांपत्य असते तर त्यांना कधीच मान्य झाली नसती हे छगनराव भुजबळ यांना लक्षात यायला हवं. तुम्हाला सरस्वतीची पुजा मान्य नसेल कदाचित उरलेल्या आयुष्यात करू पण नका. पण तुमच्याकडे असलेल्या शैक्षणिक संस्था त्यात सरस्वतीचा अप्रत्यक्ष वावर आणि सुगंध पसरलेला असतो. ते खऱ्या अर्थाने तुम्ही लक्षात घ्यायला हवं. सामाजिक समता, न्याय ही भाषा खऱ्या अर्थाने मग तुमच्या तोंडी केवळ राजकिय नाटक म्हणुनच असते का? असे अनेक प्रश्न जनतेच्या मनात येवु शकतात. किमान मंत्री पदावर बसल्यानंतर तरी एखाद्या समाजाला टक्केवारीच्या नजरेत पहाणं हा फार मोठा सामाजिक गुन्हा ठरू शकतो हे मंत्री भुजबळ साहेबांनी लक्षात घ्यायला हवं.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# ई कचऱ्याची गंभीर समस्या

आधुनिक केसरी

**ई कचऱ्याची इतकी गंभीर समस्या आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्याविषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याच्या निचरा देखील आपण इतर कचऱ्याप्रमाणेच करतो. निकामी झाल्याने फेकून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात.**

हे घटक पर्यावरणातील हवा आणि पाण्यात मिसळले की सभोवतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलच्या किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आद्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि माती दूषित करते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी सुमारे तीस दशलक्ष संगणक निकामी झाली म्हणून फेकून दिले जातात. यांपैकी वीस टक्क्यांहुन कमी संगणकाचे पुनर्विनिकरण केली जाते. युरोपमध्ये तर ददरवर्षी सुमारे शंभर दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, फेकून दिलेली ही इलेक्ट्रॉनिक उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरिलीयम, कॅडीमीयम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्यावर वेळीच आणि गांभीर्याने उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन, त्याचे रिसायकलिंग आणि त्याचे री - मॅन्युफॅक्चरिंग महत्वाचे आहे त्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाद्वारे सादर केलक्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# बनावट कागदपत्रांआधारे बळकावले घर

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दखल घेताच गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पुंडलिकनगर पोलिसांचे आर्शिवाद असलेल्या रेकार्डवरील गुंडानी बनावट कागदपत्रे तयार करून चक्क एका ८० वर्षीय विधवा हिंदु महिलेचे घर बळकावल्याचे समोर आले आहे. ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असताना देखील गुंडानी भरदिवसा महिलेच्या घरातील साहीत्य रस्त्यावर फेकुन घराचा बळजबरीने ताबा घेतला. गुंडाचा हा नंगानाच सुरु असताना विधवा महिलेने पुंडलिकनगर पोलिसांना मदतीची याचना केली मात्र त्यांना पाझर फुटला नाही. अखेर शिवसेनेचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दखल घेताच पुंडलिकनगर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

शहरात बनावट कागदपत्रा आधारे भुखंड हडप करणाऱ्या टोळीने पुन्हा डोके वर काढली आहे. तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी भुखंड माफियाविरुद्ध धडक मोहिम राबविल्यानंतर हि टोळी गायब झाली होती. आता पुन्हा या टोळीने डोके वर काढले आहे. कटकट गेट येथील कोटयावधी रुपयांचा भुखंड बनावट कागदपत्रा आधारे तीन रेकार्डवरील माफियांनी हडप करण्याचा प्रयत्न केल्याची घटना ताजी असतानाच विश्रांतीनगरातील एका विधवा महिलेचे घराची बनावट कागदपत्रे तयार करून भुखंड माफियांनी घरच हडप केल्याचे समोर आले आहे. वनवन फिरणाऱ्या हिंदु महिलेस अंबादास दानवे यांनी मदत केल्याने पुंडलिकनगर पोलिसांनी या भुखंड माफियांविरुद्ध गुन्हा दाखल केला. शिवशंकर कॉलनीतील सुमनबाई रंगनाथ धोंगडे (८०) यांचे विश्रांतीनगरात दोन भुखंड आहेत. त्यावर घर बांधण्यात आले असुन त्या ठिकाणी त्यांची मुलगी संध्या हि पतीसह राहते. सुमनबाई यांनी १९९५ साली कुलकर्णी यांच्याकडुन बाराशे स्केवर फुटाचा प्लाट खरेदी केला होता. पतीच्या निधनानंतर त्या मुलीकडे राहण्यासाठी गेले होते. बनावट कागदपत्रा आधारे भुखंड हडप करणाऱ्या टोळीने २०१९ साली खरेदी केल्याचे कागदपत्रे दाखवत घररिकामे करण्यासाठी दबाव टाकला. दोन टोळयांनी घराची बनावट कागदपत्रे तयार केली. घरावर झेंडे लावणे, घराला आग लावणे, घरफोडी करून सामान पळवुन त्रास देत असल्याने सुमनबाई यांनी पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मात्र आधिकाऱ्यांना पाझर फुटला नाही. उलट त्यांनी भुखंड माफियांनाच पाठीशी घालत सुमनबाई यांच्या तक्रारीला केराची टोपली दाखवली. या टोळक्यांच्या त्रासाला कंटाळुन सुमनबाई यांनी पोलीस आयुक्तांकडे देखील तक्रार दिली मात्र उपयोग झाला नाही. भुखंड माफियांच्या सततच्या त्रासाला कंटाळुन सुमनबाई यांनी २८ आक्टोबर २२ रोजी आत्महत्येचा प्रयत्न केला. चार दिवसानंतर शुद्धीवर आल्यानंतर पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवला मात्र कारवाइ शुन्य. पुंडलिकनगर पोलीस भुखंड माफियांना पाठीशी घालत असल्याचे समोर आल्यावर सुमनबाई धोंगडे यांनी थेट विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडे मदतीची मागणी केली. अंबादास दानवे यांनी तात्काळ पुंडलिकनगर पोलीस ठाण्याचा पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांच्याशी मोबाइलवर संपर्क करून गुंडप्रवृत्तीचा राहुल चाबुकस्वार व त्याच्या टोळीला पाठीशी का घालता त्याच्यावर कारवाइ करा, सामान फेकत असताना व्हिडीओ मध्ये दिसत आहे. त्यांच्यावर कारवाई करा अशी सुचना केली. यावरुन उपनिरीक्षक आनंद बनसोडे यांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. गुन्हयाची आनखी कलमे वाढवण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

**पुंडलिकनगर पोलिसांचा कानाडोळा :** रोशनगेट बारी कॉलनीतील शेख सरफराज शेख सलीम, हुसेन कॉलनीतील राहुल साहेबराव चाबुकस्वार, जुना मोंढा लक्ष्मण चावडीतील पाशाभाई पठाण वेल्डींगवाले, बायजीपुरा भागातील नसीब नजीर शेख आणि सय्यद साबेर सय्यद मोहमद अली, गारखेडा, इंदिरानगरातील खाजामिन लतीफ सय्यद, हनुमान नगरातील प्रमोद रावसाहेब सोनकांबळे आणि सुरेखा पंडित बिरसोने यांच्या टोळीने ६ आगस्ट रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास आम्हाला घर विकले आहे असे म्हणत संध्या रावलेलु व त्याच्या पतीला मारहाण करून घरातील सामान बाहेर फेकुन पत्रे उखळुन फेकली. तसेच घराची तोडफोड करून बळजबरीने घराचा ताबा घेतला. मदतीसाठी सुमनबाई ह्या मुली व जावयांना घेउन पुंडनिलकनगर ठाण्यात पोहोचले असता पोलिसांनी त्यांना मदत न करता हुसकावुन लावले. हि घटना सीसीटिव्ही कॅमेऱ्यात वैद झाली आहे. पुंडलिकनगर पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्याने या भुखंड माफियांनी शनिवारी गाव गुंडाच्या मदतीने घरावर कुलुप ठोकले. **सहायक आयुक्तांच्या आदेशालाही जुमानले नाही...** पुंडलिकनगर पोलीस ठोस कारवाई करत नसल्याने सुमनबाई ह्या मुलींसह गुरुगोविंदसिंगपुरा विभागाचे सहायक आयुक्त रणजित पाटील यांची भेट घेत त्यांना रेकार्डीग आणि फोटोसह घराची कागदपत्रे दाखवली. सर्व कागदपत्राची शहनिशा केल्यानंतर सहायक आयुक्त पाटील यांनी पुंडलिकनगर पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले मात्र तीन दिवसानंतरही गुन्हा दाखल न करता त्यांचा आदेशाला केराची टोपली दाखवली.

# बल्लारपूर येथे 'लिडकॉम आपल्या दारी' कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, चंद्रपूरच्या वतीने बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे संत रोहिदास समाज भवन, बल्लारपूर शहरातील रवींद्र नगर व गणपती वार्ड येथे लिडकॉम आपल्या दारी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक विजयालक्ष्मी मनीरत्न यांच्यासह शिवकुमार बांगडे, अनिल बांगडे, शामराव लिपटे, महादेव खंडाळे, वसंता दाहेदर, शंकर जोगे तसेच मोठ्या संख्येने चर्मकार बांधव उपस्थित होते.

"शासन आपल्या दारी" या संकल्पनेतून महामंडळातर्फे लिडकॉम आपल्या दारी हा मेळावा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला. महामंडळाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून जास्तीत-जास्त लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचाव्यात हा उद्देश ठेवून हा मेळावा घेण्यात आला. यावेळी महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक विजयालक्ष्मी मनीरत्न यांनी महामंडळाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित चर्मकार बांधवांना दिली. चर्मकार समाज व्यवसायात यावा, या समाजातून यशस्वी व्यावसायिक घडावे, यासाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त नागरीकांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




# चंद्रपुरात ओला दुष्काळ जाहीर करा


## राजू झोडे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात 20 दिवसानंतर शुक्रवारी मध्यरात्री पासून मुसळधार पाऊस बरसला. अशातच अनेक नदी नाल्यांना पूर आला असून अनेक शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तर अनेकांच्या शेतात पाणी जमा झाले असून धान, सोयाबीन, कापूस, भाजीपाला पीक संपूर्ण पाण्याखाली गेले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी व जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडे केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर, चिमूर, मूल, बल्लारपूर पोंभुरणा, गोंडपीपरी यासह इतर तालुक्यात मागील तीन दिवस मुसळधार पाऊस बरसला. परिणामी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे व पुराचे पाणी जमा झाले, तर अनेक शेतकऱ्यांचे शेतपिके पाण्याखाली गेले असून प्रचंड नुकसान झाले आहे. महागडे औषध फवारणी तसेच मजुरी सुद्धा वाया गेली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, त्यामुळं नुकसानग्रस्त शेतपिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई करावी, तसेच जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र Business Katta









# आरती साहा: पोहण्याचे अचाट कौशल्य



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आरती साहा या एक लांब अंतर पोहणाऱ्या प्रसिद्ध भारतीय महिला आहेत. आरती चार वर्षांच्या असताना त्यांनी पोहायला सुरुवात केली. त्यांचे पोहणे सचिन नाग यांनी पाहिले आणि त्यांची शिफारस केली. इंग्लिश खाडी पार करण्याचा प्रयत्न करण्यासाठी भारतीय जलतरणपटू मिहिर सेन यांनी त्यांना प्रेरणा दिली. सन १९५९मध्ये त्यांनी इंग्लिश खाडी पार केली. त्यानंतर त्या असे करणाऱ्या आशियायी खंडातल्या पहिल्या महिला ठरल्या. सन १९६०मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आरती साहा यांचा जन्म कलकत्त्यातील एका मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात दि.२४ सप्टेंबर १९४० रोजी झाला.  त्यांना दोन मोठ्या बहिणी व एक मोठा भाऊ होता. वडिलांचे नाव पंचगोल साहा असे होते. ते भारतीय सैन्यात एक सामान्य कर्मचारी होते. आरती दोन वर्षांच्या असताना त्यांची आई वारली.**



जेव्हा त्या चार वर्षांच्या होत्या, तेव्हा त्या त्यांच्या काकांकडे नागपूरजवळच्या चामपटाला घाटात जायच्या. तिथे त्या पोहायला शिकल्या. सन १९४६मध्ये पाच वर्षे वयाच्या असताना त्यांनी शैलेंद्र मेमोरियल जलतरण स्पर्धेत ११० यार्ड फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक जिंकले. तेव्हापासून त्यांच्या पोहण्याच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. त्यांचे पोहण्यातील कौशल्य पाहून विख्यात भारतीय जलतरणपटू व प्रशिक्षक सचिन नाग यांनी त्यांना जलतरणाचे धडे दिले.

सन १९४६ आणि १९५६ दरम्यान आरतींनी अनेक जलतरण स्पर्धांमध्ये भाग घेतला. सन १९४५ आणि १९५१च्या दरम्यान त्यांनी पश्चिम बंगालमधील २२ राज्यस्तरीय स्पर्धा जिंकल्या. त्यांचे मुख्य क्षेत्र १०० मीटर फ्रीस्टाईल, १०० मीटर आणि २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक असे होते. सन १९४८मध्ये त्यांनी मुंबई येथे आयोजित झालेल्या राष्ट्रीय विजेतेपद स्पर्धेत भाग घेतला. त्यांनी १०० मीटर फ्रीस्टाईल आणि २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये रौप्यपदक आणि २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये कांस्यपदक जिंकले. सन १९४९ साली त्यांनी अखिल भारतीय विक्रम केला. सन १९५१मधील पश्चिम बंगाल राज्याच्या दौऱ्यावर असताना त्या १ मिनिट ३७.७ सेकंदांत ब्रेस्ट स्ट्रोक मारून १०० मीटर पोहून डॉली नझीरचा अखिल भारतीय विक्रम मोडीत काढला. त्याच स्पर्धेत त्यांनी १०० मीटर फ्रीस्टाईल, २०० मीटर फ्रीस्टाईल आणि १०० मीटर बॅक स्ट्रोक्समध्ये नवीन राज्यस्तरीय रेकॉर्ड सेट केले. सन १९५२च्या हेलसिंकी ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघटनेचे सदस्य संख्येने सर्वात कमी होते. त्यावेळी त्यांनी भारताच्या डॉली नझीर व आणखी दोघींसह भारताचे प्रतिनिधित्व केले. तेथे त्यांनी २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक इव्हेंटमध्ये भाग घेतला. हिट्सवर त्यांनी ३ मिनिटे ४०.८ सेकंदांची कमाई केली. ऑलिम्पिकमधून परतल्यानंतर त्यांनी १०० मीटर फ्रीस्टाईलसाठी त्यांची बहीण भारती साहा यांना गमावले. प्रख्यात भारतीय जलतरणपटू मिहिर सेन यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी २९ सप्टेंबर १९५९ रोजी फ्रान्समधील केप ग्रिस नेझ ते इंग्लंडमधील सँडगेट अशी ४२ मैल- ६७५९किमी अंतराची इंग्लिश खाडी १६ तास २० मिनिटांत पोहून पार केली व सँडगेट येथे भारताचा तिरंगा ध्वज फडकविला. हा विक्रम करणाऱ्या त्या आशियातील पहिल्या महिला ठरल्या. त्यांना सन १९६० साली भारत सरकारने पद्मश्री हा पुरस्कार देऊन गौरविले.

जलपरी आरती साहा यांचे कोलकाता येथे दि.२३ ऑगस्ट १९९४ रोजी काविळीच्या आजाराने निधन झाले. त्यांच्या मुलीचे नाव अर्चना गुप्ता असून त्या कोलकाता येथील सॉल्ट लेक स्कूलमध्ये अध्यापनाचे काम करतात. सन १९९६ साली त्यांच्या निवासस्थानाजवळ आरती साहा यांचा एक भव्य अर्धपुतळा स्थापन करण्यात आला. तेथे १०० मीटर लांबीचे मोठे दिवे लावण्यात आले आहे. जलतरणातील योगदानाबद्दल त्यांच्या सन्मानार्थ सन १९९८ साली भारतीय टपाल खात्याने त्यांच्या नावे तिकिटाचे प्रकाशन केले.

# चांद्रयान ३ यशाच्या उंबरठ्यावर



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**रशियाची चंद्रयान मोहीम अखेरच्या टप्प्यात अपयशी ठरल्यानंतर आता संपूर्ण जगाचे लक्ष भारताच्या महत्त्वकांकशी चांद्रयान तीन मोहिमेवर केंद्रित झाले आहे. प्रक्षेपणानंतर एकेक टप्पा यशस्वीपणे पूर्ण करत चंद्रयान तीन अखेरच्या टप्प्यात पोहोचले आहे. भारताचे लँडर मॉडेल चंद्रापासून अवघे २५ किमी दूर आहे आता बुधवारी लँडरचे चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद लँडिंग करण्याची योजना आहे. पण हा टप्पा सर्वात कठीण असल्याचे इस्त्रोचे संपूर्ण कौशल्य पणाला लागणार आहे. जर ही मोहीम यशस्वी ठरली तर अशी कामगिरी करणारा भारत जगातील चौथा आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरेल. लॅन्डर विक्रम आणि रोव्हर प्राज्ञान समावेश असलेल्या लॅन्डर मॉडेलची दुसरी अर्थात वेग हळूहळू कमी करण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली आहे.**

यान आता चंद्राच्या पृष्ठभागापासून किमान २५ किमी दूर तर कमाल १३४ किमी  अंतराच्या कक्षेत पोहोचले आहे आता मॉडेलची अंतर्गत तपासणी केली जाईल यानंतर बुधवारी सायंकाळी सहा वाजून चार मिनिटांच्या सुमारास यानाचे थेट चंद्राच्या पृष्ठभागावर शॉप लर्निंग केले जाईल हा टप्पा सर्वात आव्हानात्मक आहे चंद्र या दोन मोहीम यास तक्त्यावर अपयशी ठरला होता त्यामुळे इष्ट करून यावेळी काळजीपूर्वक पावले उचलली जात आहे १४ जुलै रोजी प्रक्षेपक्ष  केल्यापासून चंद्रयान तिने आतापर्यंत प्रवास कोणत्याही अडथळ्या विना यशस्वीपणे पूर्ण केला आहे. त्यामुळे शेवटचा लँडिंग चा टप्पा देखील यान यशस्वीपणे पूर्ण करेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. ही मोहीम यशस्वी ठरली तर इस्ट्रोच्या इतिहासातील महिलाचा दगड दगड ठरेल हे यश भारतीय विज्ञान अभियांत्रिकी तंत्रज्ञान आणि उद्योगासाठी महत्त्वपूर्ण पाऊल असेल. देशाच्या अंतराळ संशोधनातील प्रगतीची प्रतिक म्हणून या मोहिमेकडे पाहिले जाईल. चंद्रयान तीन चे सॉफ्ट लंडिंग आहेत महत्त्वाचा क्षण आहे. हे फक्त कुतूहलाने  क्षण नाही तर तरुणांच्या मनात संशोधनाची आवड निर्माण करणारी घटना ठरेल. प्रक्षेपणानंतर यानाने पृथ्वीची  कक्षा पाच टप्प्यात मागे टाकत पाच अगस्त रोजी चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला होता. चंद्रयान दोन प्रमाणे चंद्रयान तीन उतरण्यासाठीही चंद्राच्या कायमस्वरूपी अंधारात राहणाऱ्या दक्षिण ध्रुवाची निवड करण्यात आली. या ठिकाणी पाणी आढळण्याची शक्यता अधिक आहे. चंद्राच्या पृष्ठभागाव सुरक्षित लँडिंग करत तेथील वातावरणाचा व दगड मातीचा अभ्यास करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

आतापर्यंत अमेरिका तत्कालीन सोबत युनियन आणि चीन यातील देशांना चंद्रावर यान उतरवण्यात यश आले आहे .चंद्रयान ३चे लँडिंग यशस्वी झाले तर ही कामगिरी करणारा भारत चौथा देश ठरेल.चांद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार आहे आतापर्यंत कोणत्याही देशाची  यान या ठिकाणी पोहोचू शकले नाही. त्यामुळे सर्व काही नियोजनाप्रमाणे पार पडले तर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवणारा भारत जगातील पहिला देश असेल.



# हिरकणी तेव्हाची व आत्ताची...



प्रा.सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**"हिरकणी" हा शब्द उच्चारताच आपल्यासमोर येतो तो भव्य उंच रायगडाचा बुरूज... व रात्रीच्या किर्र अंधारात आपल्या भुकेल्या बाळासाठी तो बुरुज उतरून येणारी वात्सल्य सिंधू हिरकणी... सर्वत्र किर् अंधार... खाली खोल दरी... जेथून खाली उतरणे केवळ अशक्य... पण आपलं भुकेलं बाळ आपली वाट पाहत असेल... गडाचे दरवाजे बंद झालेले... व डोळ्यासमोर  दिसणारा बाळाचा व्याकुळलेला चेहरा ...यातून शेवटी बुरुज उतरण्याचा निर्णय घेणारी धन्य ती हिरकणी माय... पण या हिरकणी सारख्याच आजही आपल्या समाजात ठीक -ठिकाणी अनेक हिरकण्या दिसत आहेत. त्यातल्याच एका हिरकणी विषयी लिहावेसे वाटले... खरंच ही हिरकणी सुद्धा तेवढीच धन्य -धन्य आहे...**



सकाळचे सात वाजले होते... रात्रीच एक ऑपरेशन करून तिला यायला उशीर झाला होता... व तरीही रोजच्याच वेळेला उठून ती आवरत होती... नुकताच फ्रेश होऊन चहा घेण्यासाठी बसली... तेवढ्यात हॉस्पिटल मधून फोन आला...," मॅडम एक अर्जंट केस आहे... डिलेवरी साठी एक पेशंट आलेले आहे... त्या बाईला खूप त्रास होतो आहे... तिच्यासोबत आलेले तुम्हाला लवकर खाली या असे सांगत आहेत..."

चहा घेत- घेत तिने थोड्या वेळात लगेच येते असं सांगितले... पटकन तयार झाली... व खाली आली... चहा सुद्धा कसा -बसा घेतला...

आली की जशा पदर खोचून स्त्रिया स्वयंपाकाला लागतात तशी सर्व तयारीनिशी ऑपरेशन थिएटर मध्ये गेली... आलेल्या गर्भवतीचे तिने चेकअप केले... थोड्या वेळात बाहेर आली.. थांबलेल्या नातेवाईकांना म्हणाली...,"अजून थोडा वेळ लागेल तिची डिलिव्हरी सुरू झालेली आहे. आपण नॉर्मल डिलिव्हरी होण्यासाठी प्रयत्न करू... तुम्ही बसून घ्या... काही काळजी करू नका सर्व काही व्यवस्थित होईल..."गर्भवती मुलीची आई म्हणाली...,"मॅडम जरा ध्यान द्या पोरीकडं, अर्ध्या रात्री पासून तिची बेजारी व्हायली. होईल तेवढ्या लवकर मोकळं करा तिला...,"ती म्हणाली...,"हो आता इंजेक्शन दिलेले आहेत... बघू काय होईल ते तुम्ही फार काळजी करू नका... अजून थोडा वेळ लागेल. मी आहे इथेच...,"सिस्टर तिच्याकडे लक्ष देत होत्या. अधूनमधून ती सुद्धा पेशंट कडे बघत होती... आणि जवळपास नऊ वाजता... तिची डिलिव्हरी झाली. तिला पहिली मुलगी होती. आता मुलगा झाला..

वडिलांसह सर्वांनाच आनंद झाला. बाळाच्या आजीच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.... बाळ बाळंतीण सुखरूप होते. सारं काही आवरून औषध लिहून देऊन ती आता वर गेली. पुन्हा स्वतःचे सर्व उरकून थोडासा नाश्ता केला. तोपर्यंत अकरा वाजत आले होते.ती पुन्हा खाली आली. हॉस्पिटल मधील सर्व पेशंटची तपासणी झाली. ओ.पी.डी .साठी बरेच पेशंट थांबले होते. आता जवळपास साडेबारा वाजले होते.

आलेले बरेच पेशंट ती बघत होती.. काहींची सोनोग्राफी होती. त्यामुळे जास्तच वेळ लागत होता. काहींची एम.टी.पी., काहींचे फॅमिली प्लॅनिंग, अशाप्रकारे अनेक महिला पेशंट तिच्याकडे आले होते... प्रत्येक पेशंट शी तेवढ्याच प्रेमाने संवाद साधत होती. तिचा तो स्नेहभाव आपुलकी व उपचार करण्याची पद्धत  सर्वांनाच आवडायची. म्हणूनच तिच्या दवाखान्यातही खूप गर्दी होती. आता बराच उशीर झाला होता. दुपारचे दोन वाजले होते. तेवढ्यात सिस्टर तिला सांगायला आली.,"मॅडम चार नंबरच्या पेशंटला पेन सुरू झाले आहेत., लवकर डिलिव्हरी रूम मध्ये घ्यावे लागेल.,"मॅडमनी हो म्हणून सांगितले.. तसेच सर्व तयारी करा म्हणूनही सांगितलं.,"थोड्याच वेळात तिला डिलिव्हरी रूममध्ये नेण्यात आले... साधारण अर्ध्या तासानंतर बाळाच्या रडण्याचा आवाज आला.... रोज तिचं हे जीवन असं चालू असतं. कितीतरी बाळांना जन्म देणं, कितीतरी आयांची सुटका करणं... कितीतरी आई-वडिलांच्या आशीर्वाद घेणं... यामध्ये खरंतर तिची प्रचंड धावपळ होते. सर्वांना तिला मिळालेला पैसा दिसतो. पण तिची मेहनतही तशीच असते. आपल्या डॉक्टरी पेशाला प्रामाणिक राहून कार्य करणाऱ्या अशा सर्वच स्त्रिया आत्ताच्या हिरकणी तर आहेत... त्यांच्या या कार्याला व कर्तृत्वाला खरोखरच सलाम...

# पेपर फुटीचा खेळ मांडला... खेळ मांडला...!

## सरकार संवेदनशील प्रश्नाची दखल घेणार का? आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या सडेतोड प्रतिक्रिया



आधुनिक केसरी

महाराष्ट्रात विविध स्पर्धा परीक्षेत पेपरफुटीने कळस गाठला आहे. लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबांचे भावनिक आणि आर्थिक शोषण करणाऱ्या प्रवृत्ती थांबायचे नाव घेत नाहीत. पेपरफूट गैरव्यवहार, परीक्षा फीची लूट थांबत नसेल तर या प्रश्नांना वाचा कोण फोडणार? हा प्रश्न अस्वस्थ करतो. परवाच नाशकात तलाठी भरतीच्या परीक्षेत संशयिताजवळ संशयास्पद वस्तू आढळून आल्यावर या परीक्षांच्या पारदर्शकतेविषयी अनेक प्रश्न उभा राहतात. यावरूनच विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधी, सरकार आणि समाज गंभीर आहे का? हा प्रश्न चिंता निर्माण करणारा आणि खेळ मांडला..खेळ मांडला.. असा वाटत राहतो. याचविषयी आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांनी सडेतोड प्रतिक्रिया दिल्या...

आधुनिक केसरी जनचर्चा

### सामान्य विद्यार्थी भरडतोय त्याचे काय?

महाराष्ट्रामध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात एमपीएससीच्या मार्फत वेगवेगळ्या पदासाठी जागा निघत असतात. हजार जागेसाठी लाखोंच्या संख्येने पात्र उमेदवाराकडून अर्जही प्राप्त होतात.मात्र त्यांची नियुक्ती खऱ्या अर्थाने पात्र उमेदवार निवडून केली जाते का?हा एक संशयास्पद प्रश्नच आहे.कारण अलीकडे पेपर फुटीसारख्या अनैतिक मार्गाने मोठ्या प्रमाणात तोंड वर काढले आहे.अलीकडेच नाशिकमध्ये तलाठी भरतीच्या जागा निघाल्या होत्या आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरमार्गाचा वापर करतांना विद्यार्थी आढळून आले.

आज बेरोजगारीने एवढ्या मोठ्या प्रमाणात आपले तोंड वर काढले आहे की अनेक विद्यार्थी पात्रता असूनसुद्धा नोकरीअभावी बेरोजगारीच्या विळख्यात पडलेले आहे तर दुसरीकडे ज्या घरची मुलं पैशाने गर्भश्रीमंत आहेत अशा मुलांना मात्र पेपर फुटीसारख्या प्रकरणात सहभाग घेऊन सहजपणे पास होता येते. या गोष्टीचा एक दुष्परिणाम असा निघतो की जे खऱ्या अर्थाने कष्ट,मेहनत, ध्येय, जिद्द घेऊन अभ्यास करतात त्यांचे या पेपर फुटीच्या प्रकरणाशी काहीही देणे घेणे नसते. ते या पेपर फुटीच्या मार्गापासून खूप लांब असतात. खऱ्या अर्थाने मेहनत करूनही ते ज्यावेळी नापास होतात किंवा या प्रकरणात पडत नाही आणि काही विद्यार्थ्यांची लायकी नसतानासुद्धा पैशामुळे ते सहजपणे या स्पर्धा परीक्षांमध्ये पास होतात त्यांचे मात्र जमून जाते आणि खरा पात्रता लायक विद्यार्थी या नोकरीपासून वंचित राहतो. हे सर्व आजच्या व्यवस्थेमध्ये खुलेआम होताना आपल्याला दिसते.

त्यामुळे सरकारने किंवा राजकारण्यांनी या गोष्टीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.ज्याच्या हाती ससा तोच पारधी असे म्हणण्याची वेळ आता आलेली आहे. म्हणूनच खऱ्या व्यक्तीला न्याय मिळाला पाहिजे आणि खोट्याला शिक्षा झाली पाहिजे.असे झाले तरच पेपरफुटीच्या प्रकरणावर खऱ्या अर्थाने आळा बसेल असे म्हणायला हरकत नाही. **- डॉ.अनंता सूर, वणी, जि.यवतमाळ**



### पेपर फोडणाऱ्यांची व अधिकाऱ्यांची इतकी हिंमत वाढतेच कशी?

परिक्षेच्या पेपर फुटी बाबतची बातमी ऐकायला मिळाली.असे अनेक चोरीचे प्रकरणे प्रत्येक कार्यालयात घडत आहेत.हे अत्यंत वाईट आहे. आज कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कुठलेच काम होत नाही हेही तेवढेच सत्य आहे. आज विद्यार्थी मात्र चरख्यात ऊस पिळून निघावा तसा नानाविध संघर्षातून पिळून निघतो आहे. जे विद्यार्थी परिक्षेसाठी अभ्यास करतात, मेहनत करतात, जीवाची रान करतात, आयुष्याची चांगली स्वप्न रंगवतात पण अशा नालायक अधिका-यामुळे त्या बिचाऱ्यांची स्वप्न धुळीस मिसळतात.मेहनत,कष्ट, अपेक्षा, आकांक्षा यावर पाणी फिरले जाते अन् चांगुलपणावरचा त्यांचा विश्वास उडाला जातो.जगण्यातला आत्मविश्वास नैराश्याकडे घेऊन जातो. जगण्याला काही अर्थ नाही म्हणून अनेक विद्यार्थी, कर्मचारी आपले जीवन संपवून टाकतात केवळ अशा अधिकार्‍यांच्या भ्रष्टाचारी,अनितीच्या वागण्यामुळे. आज केवळ पेपर फुटीचेच प्रकरण नाही तर सर्वच खात्यामध्ये भ्रष्टाचार खूप वाढला आहे. अनेक कर्मचाऱ्यांचे वेगवेगळ्या प्रकारच्या कारणाने शासकीय अधिकारी,वरचे अधिकारी प्रचंड पिळवणूक,शोषण करताना दिसतात.अनेकजण रंगेहाथ पकडले जातात. त्यांच्या तक्रारी केल्या तरीही त्यांच्या विरोधात शासन कधीही कडक कारवाई करण्याची भूमिका घेताना दिसत नाही. त्यांचे निलंबन काही महिन्यापूरते असते. परत ते त्यांच्या जागी येतात. म्हणून अधिकाऱ्यांनाही निलंबनाचे काहीच वाटत नाही कारण सरकार त्यांच्या पाठीशी उभे राहते. सरकारने वेळीच अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची दखल घेऊन कारवाई केली तर निश्चित असे प्रकार घडणार नाहीत परंतु तसे होताना दिसत नाही. शासकीय अधिकाऱ्यांचे आणि सरकारचे आर्थिक लागेबांधे असतात असे बोलले जाते. ते खरीही वाटायला लागते. कारण अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या तक्रारी केल्यानंतर सरकार त्याकडे गांभीर्याने कधीच घेताना दिसत नाही.उलट तक्रार करणाऱ्यांवर आरोप करून त्यालाच नामोहरम करण्याचा प्रयत्न केला जातो. तक्रार करणाऱ्यांना विविध प्रकारच्या माध्यमातून दोषी ठरवले जाते. सरकारकडे वारंवार तक्रारी करूनही सरकार कोणत्याच प्रकारे सामान्य माणसाची, अन्यायग्रस्त माणसाची, विद्यार्थ्यांच्या तक्रारीची चौकशी करताना दिसत नाही. चौकशी केली तरीही ते थातूरमातूर असते.त्यामुळे अनेक कर्मचारी संपून जातात. हे कुठेतरी थांबायला हवे. सरकारने जनतेचे कल्याण साधायला हवे. अशा भ्रष्टाचारी,नालायक अधिकाऱ्यावर वेळच्या वेळीच कडक कारवाई करणे गरजेचे असते. सरकार कधी कधी कारवाई करते पण मी मारल्यासारखं करतो तू रडल्यासारखं कर अशीच कारवाई असते. त्यामुळेच आशा पेपर सोडणाऱ्यांची हिंमत वाढते.कारवाई केली तर सरकारवरचा विश्वास वाढेल अन्यथा अशांना सरकारचेच अभय असते की काय असे वाटायला लागेल. **- डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे**

### सरकारला जागा भरायच्या नाहीत

विविध खात्याच्या जागा निघत आहेत असं दाखवायचं विद्यार्थी कडून विविध अर्जाच्या नावाखाली भरम साठ पैसे जमा करायचे हेच सुरू आहे.

गेल्या काही वर्षांत अनेक जागा निघाल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या त्याच वेळेस पेपर फुटला हे आता एकदम सोपं झालं आहे. असा घोटाळा करणाऱ्यांना जर वेळीच कडक सजा झाली नाही तर पुन्हा पुन्हा असे घोटाळे होणारच आहे. मुळात प्रश्न हा आहे की सरकारला जागा भरायच्या नाही फक्त दाखवायचं आहे की आम्ही किती जागा काढल्या. या जागा भरतांना सरकार कडे कोट्यावधी अब्जावधी रुपये जमा होऊ लागले आहेत. सरकार सरकारी जागेच्या नावाखाली पैसे कमावण्याचे आणि एखाद्या online कंपनीला फायदा करून देत आहे.

सरकार जाणून बुजून विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ खेळत आहे. लोकप्रतिनिधी आपली खुर्ची कसी साबूत राहील याकडे लक्ष देत आहे त्यांना जराही लक्ष द्यायला वेळ नाही. भरती उमेदवाराकडून एवढा मोठा पैसा जमा झाला आहे की तेवढ्या पैशात एखादी भली मोठी कंपनी सुरू होऊ शकते त्यातून हजारो विद्यार्थीना रोजगार मिळू शकतो. आज केवळ पेपर फुटीचेच प्रकरण नाही तर सर्वच खात्यामध्ये भ्रष्टाचार खूप वाढला आहे. अनेक कर्मचाऱ्यांचे वेगवेगळ्या प्रकारच्या कारणाने शासकीय अधिकारी,वरचे अधिकारी प्रचंड पिळवणूक,शोषण करताना दिसतात.अनेकजण रंगेहाथ पकडले जातात. त्यांच्या तक्रारी केल्या तरीही त्यांच्या विरोधात शासन कधीही कडक कारवाई करण्याची भूमिका घेताना दिसत नाही. त्यांचे निलंबन काही महिन्यापूरते असते. परत ते त्यांच्या जागी येतात.

**कॉ. मधुकर खिल्लारे, औरंगाबाद**

### सरकारचा नोकरभरती उत्पन्नाचा मार्ग झाला काय?

राज्यातील तलाठी पदाच्या भरतीसाठी तब्बल 1 अब्ज 4 कोटी 17 लाख 13 हजार रुपये परीक्षा शुल्क म्हणून सरकारने उकळले आहे. यावरूनच सरकारचा नोकरभरती हा उत्पन्नाचा नवा मार्ग झाला काय? अशी ठाम शंका व्यक्त होते. संबंधित पदाचा फॉर्म भरणे, विद्यार्थ्यांना अवाक्याबाहेरचे शुल्क भरणे, परीक्षा देण्यासाठी बाहेरगावी जाण्याचा खर्च असा मोठा भुर्दंड विद्यार्थी सोसत असताना सरकार या सावळ्या गोंधळाकडे लक्ष न देता लाखो विद्यार्थ्यांच्या भावनांशी खेळताना दिसत आहे. सरकारने ही सारी परीक्षा पद्धती स्वतः राबवायचे सोडून हा सारा पैसा कार्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचा उद्योग सरकारने राबवला आहे., तो थांबवणे गरजेचे आहे. नसता बेरोजगारांचा अंत पाहणा-या यंत्रणेला पुढील काळात मोठा रोष बघावा लागेल एवढे सत्य मात्र नाकारता येणार नाही. **-अमर चव्हाण लातूर.**

### पेपरफूट प्रकरणातील गुन्हेगारांची नावे उघड करा...

हे जर का असेच चालू राहिले तर पुढील पिढी आपली कौटुंबिक परिस्थिती सांभाळण्यासाठी फक्त गुन्हेगार होऊ शकण्याची ठाम भीती आहे. त्याला कारणीभूत आपली सिस्टीम असणार आहे किंवा आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही. आणि अशा संधीचा फायदा घेऊन राजकारणी मंडळी " मी लक्ष घालून सर्व नीट करतो... " म्हणून स्वतःचा प्रसार करणार हे नोंदवले पाहिजे. देश नीट राहण्यासाठी भावी पिढी शिकलेली पाहिजे. नाहीतर असेच चालू राहिले तर ह्या देशात आराजकता सुरु होईल. गरीब विद्यार्थी कसे शिक्षण घेतो ते जरा बघावे. उद्या त्याने पण भ्रष्टाचार सुरु केला तर त्यात गैर काय ? देशाचा युवा वर्ग शिकला तरच देशाची प्रगती होते. अन्यथा फक्त सर्वनाश हे लक्षात ठेवावे. ह्या पेपर फुटी प्रकरणात जे गुन्हेगार असतील त्यांची नावे उघड झालीच पाहिजेत. असे झाले नाही तर आपली सर्व सिस्टीम ह्यात गुंतलेली आहे असे युवा वर्गाने समजून भलतीच कृती केली तर त्यावेळी वेळ निघून गेलेली असेल हे प्रकर्षाने आठवणीत ठेवावे लागेल.

**- विजय चव्हाण, मुंबई.**

### पेपर फुटीची शृंखला थांबवा हो..

पेपर फुटीची शृंखला थांबायचे नाव घेत नाही. तरुण वर्ग नोकरीच्या अपेक्षेने वर्षाने वर्षे जागा निघण्याची, पदाभरतीसाठीच्या स्पर्धा परीक्षांची चातकासारखी वाट बघत असतो. पण नक्की काय चाललंय हे समजत नाही. जाहिराती येतात, परीक्षांचे दिनांक जाहीर होतात आणि नंतर चालतात ते सगळे गैरप्रकार आणि गैर व्यवहार, प्रत्येक वेळेस असते ती पेपर फुटी. पेपर आधीच फुटतो. जे गरजू विद्यार्थी आहेत खरच अभ्यासू आहेत त्यांची मात्र या सर्व गैर प्रकारांमध्ये विनाकारण हाल होत आहे. परीक्षा देण्याचे वय निघून चालले आहे, परीक्षेची तयारी करावी?? की उदरनिर्वाहसाठी कमवावं??हेच तरुण पिढीला पडलेला पेच आहे. तरुणांची होणारी फसगत थांबावी. त्यांना न्याय मिळवून द्यावा ही सरकारकडे विनंती आहे.

**- दिपाली उमाळे मुंबई..**

## फुलंब्री विधानसभा युवक काँग्रेस कार्याध्यक्षपदी शुभम साळवे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. कल्याण काळे साहेब यांच्या आदेशानुसार शुभम शांतीलाल साळवे यांची फुलंब्री विधानसभा युवक काँग्रेस कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली, यावेळी प्रदेशाध्यक्ष सेवादल विलास औताडे साहेब शहराध्यक्ष युसुफ शेख साहेब, किरण पाटील डोणगावकर, रवींद्र दादा काळे, भाऊसाहेब जगताप सुरेंद्र साळुंखे, दिपालीताई मिसाळ, डॉ. पवन डोंगरे अरुण शिरसाट, वरूण पाथ्रीकर, ज्ञानेश्वर जाधव, अनिस पटेल, सुभाष पांडभरे, पप्पूराज ठुबे, राहुल सावंत, अशोक डोळस, गौरव जैस्वाल, आतिश पितळे, सागर नागरे, अंकुश चौधरी, प्रकाश सानप, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही निवड करण्यात आली. यावेळी शुभम साळवे म्हणाले की, पक्षाने आणि वरिष्ठ नेत्यांनी जी जबाबदारी मला दिली मी ती अगदी निष्ठेने पार पाडेल, काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी आणि घराघरात पोचवण्यासाठी प्रयत्न करेल, जी जबाबदारी मला दिली त्याबद्दल पक्षश्रेष्ठीचे मनापासून आभार.

## नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षणावर विमाशि संघाचा बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षकांना अधिक वेळ द्यावा लागणार आहे. असे असताना त्यांना अशैक्षणिक कामे देऊन मराठी शाळा डबघाईस आणण्याचा हा प्रकार आहे. या प्रकारावर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ तीव्र खंत व्यक्त करीत असून या सर्व्हेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत असल्याचे पत्र आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालक (योजना) यांना सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी पाठविले.

'नवभारत साक्षरता कार्यक्रम - सर्वेक्षण' अंतर्गत १७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत



निरक्षर सर्व्हेक्षण, शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांच्या माध्यमातून करण्याचे आदेशित आहे. नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाल्याबरोबर १ ते २० जुलै सेतू अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमाची पूर्वचाचणी नंतर उत्तर चाचणी, १७ ऑगस्ट ते १९ ऑगस्टदरम्यान पायाभूत चाचणी व त्याचा निकाल हे संपत नाही तर १७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत निरक्षर सर्व्हेक्षण, शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण अशा विविध अशैक्षणिक कामांमुळे राज्यातील शिक्षक वैतागून गेले आहेत. या सर्व अशैक्षणिक कामांमुळे शिक्षकांना अभ्यासक्रम कधी शिकवायचा हा प्रश्न पडला आहे.

सदर सर्वेक्षणाच्या आदेशाने राज्यातील शिक्षकांत तीव्र संतापाचे भावना निर्माण झालेली आहे. शिक्षकांना प्रत्यक्ष शिक्षणाव्यतिरिक्त (जनगणना, निवडणूक विषयक कामे वगळता) कोणतेच अशैक्षणिक कामे शिक्षकांना देण्यात येऊ नये अशी RTE - २००९ मध्ये तरतूद आहे. परंतु, सतत चालणाऱ्या मतदार नोंदणी प्रक्रियेत शिक्षकांना गुंतवून ठेऊन त्रस्त केले जात आहे.

आधीच राज्यातील मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. त्यातल्यात्यात शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊन मराठी शाळा डबघाईस आणण्याचा हा प्रकार असल्याचे मत आमदार सुधाकर अडबाले यांनी व्यक्त केले. या प्रकारावर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ तीव्र खंत व्यक्त करीत असून आयुक्त (शिक्षण) पुणे, शिक्षण संचालक (योजना) पुणे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, प्रधान सचिव, शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांना या सर्व्हेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत असल्याचे पत्र विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी पाठविले.

# इंदापूर -बोडखा रस्त्याला आलेय नाल्याचे स्वरूप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी -बोडखा या मुख्य रस्त्यादरम्यान इंदापूर-बोडखा रस्त्याला नाल्याचे स्वरुप आले असुण मोठमोठी खड्डे त्यात सांड पाणी अरुंद रस्ता यामुळे सद्या वाहनधारक व नागरिकांचे हाल सुरू असून सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी या रस्त्या कडे हेतुता दुर्लक्ष करून असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग उप विभागीय कार्यालय खुलताबाद यांच्या अंतर्गत हा रस्ता असून विभागाने या रस्त्यावर लहान मोठे चारपाच पुलांचे काम केले. तर सावंगीपासून ते इंदापूर पर्यंत खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरणचे कोटी रुपये खर्च करून काम केले परंतु त्यापुढे इंदापूर ते बोडखा या रस्त्याचे काम अपूर्ण सोडून दिले. केलेले पुल व रस्ता काम अपूर्ण सोडलेल्या कामामुळे कुचकामी ठरत आहे. कारण इंदापूर पासून पुढे बोडखा लोणी चिकलठाण कन्नड असा मार्ग आहे.

इंदापूरपासून पुढे रस्ता बंद सारखाच आहे कारण रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे सांडपाणी अरुंद रस्ता ज्याला सद्या नाल्याचे स्वरुप आलेले आहे. या रस्त्यावर ये जा करतांना जीवमुठीत घेवून प्रवास करावा लागतो. याकडे मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी हेतुत दुर्लक्ष करून आहे हे विशेष.याकडे वरिष्ठधिकारी यांनी लक्ष घालून ह्या रस्त्यांचे काम पूर्ण करावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.



# गोवर्धनच्या चंदनशेष दरबारी, आ. अमित झनक यांची पायदळ वारी

## झनक घराण्याची परंपरा कायम



आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** रिसोड तालुक्यातील गोवर्धन येथील चंदनशेष संस्थान जिल्ह्यातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून वाशिम जिल्ह्यात सुप्रसिद्ध आहे. नागदेवता म्हणून येथील चंदनशेष संस्थान एक जागृत देवस्थान आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात येणाऱ्या नागपंचमीला येथे दूरवरून शेकडो भाविक दर्शनासाठी येतात. त्यानिमित्ताने या दिवशी येथे खूप मोठी यात्रा भरते. शेतकऱ्यांचे आराध्य दैवत म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नागांचे नागपंचमीला शेतकरी मोठ्या भक्ती भावाने पूजन करतात. मांगुळ झनक येथील झनक घराण्याची तिसरी पिढी आज आमदारकी भोगत असली, तरी त्यांची नाळ ही कायमची शेती आणि शेतकऱ्यांशी जोडलेली आहे. त्यामुळे आपल्या घराण्याची पायदळ वारीची परंपरा कायम राखत, विद्यमान आ.अमित झनक यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गोवर्धन ते चंदनशेष संस्थान पर्यंत पायदळ वारी करून नागदेवताचे मनोभावे पूजन केले, व आपल्या घराण्याची पायदळ वारीची परंपरा कायम राखली.

वारीच्या निमित्ताने असंख्य भाविकांची तुफान गर्दी असताना सुद्धा, आमदार झनक यांनी आपल्या आमदारकीचा कुठलाही बडेजावपणा न दाखवता सामान्य भाविका प्रमाणे रांगेत उभे राहून चंदनशेषाचे दर्शन घेतले. व बेलपत्र वाहून शेतकऱ्यांच्या दैवताचे पूजन केले. यावेळी आमदार महोदयांनी सर्व शेतकऱ्यांना हे वर्ष आरोग्यदायी व सुखसमृद्धीचे जावे म्हणून चंदनशेष चरणी प्रार्थना केली. तसेच यात्रेची शोभा वाढविण्यासाठी दरवर्षी दाखल होणाऱ्या व्यावसायिकांकडून प्रसाद व मुलांसाठी खेळणी वस्तू सुद्धा खरेदी केल्या. याप्रसंगी आमदार अमित झनक यांच्यासोबत शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाचे आज भव्य आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांतर्गत मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश अभियान जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत बुधवार २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम उद्यान येथे भूमातेला व मातृभूमीचे स्वातंत्र्य आणि तिचा गौरव यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या शूरवीरांना विनम्र अभिवादन करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमाची सुरवात वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते करण्यात येणार असुन शिलाफलक अनावरण, पंचप्रण शपथ, वसुधा वंदन, विरों का वंदन अंतर्गत स्वांतत्र्य सैनिकांना नमन करणे तसेच ध्वजारोहण करुन राष्ट्रगीताचे गायन करण्यात येणार आहे. तत्पूर्वी सकाळी ८.३० च्या सुमारास हुतात्मा स्मारक ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उद्यानपर्यंत अमृत कलश यात्रा सुद्धा काढण्यात येणार आहे.

सायंकाळी ६ वाजता चांदा क्लब मैदान येथे सांस्कृतिक कार्य विभाग व जिल्हा प्रशासनाच्या वतीने साद सह्याद्रीची ,भूमी महाराष्ट्राची अंतर्गत सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजनसुद्धा करण्यात आले आहे. अभिनेत्री सोनाली कुलकर्णी,पूजा सावंत,गायक नंदेश उमप तसेच अभिनेता श्रेयस तळपदे हे या सांस्कृतीक कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण राहणार असुन नागरीकांनी यामध्ये सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व चंद्रपूर महानगरपालिका यांच्याद्वारे करण्यात येत आहे.

याप्रसंगी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, लोकसभा सदस्य अशोक नेते, आमदार रामदास आंबटकर, अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, कीर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया, सुभाष धोटे, किशोर जोरगेवार, प्रतिभा धानोरकर तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन,पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी,डॉ.जितेंद्र रामगावकर तसेच महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# बाजार सावंगी येथे कृषी विभागातील निवृत्त कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यातील कृषी खात्यातील सेवानिवृत्त झालेले प्रशासकीय व कृषी अधिकारी कर्मचारी वर्ष 2022 अखेर पर्यंतचे सर्वच कृषी विभागातील निवृत्त यांचे स्नेहसंमेलनासाठी बाजार सावंगी येथील जय भवानी लॉन्स मध्ये एकत्र जमले. सेवेत कार्यरत असताना त्या आठवणींना उजाळा देत आपापसातील चर्चा व गाठीभेटी निवृत्तीनंतरही स्वतःचे चांगले अस्तित्व व शेतकरी बांधवांसाठी नवे काही करण्याची उमेद बाळगून सायंकाळी पाच नंतर आपापल्या गावाकडे रवाना झाले. प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन करण्यात आले. सर्व उपस्थित यांना आयोजकांतर्फे शाल पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. अध्यक्षस्थानी एए शिरा हे होते प्रमुख पाहुणे एस बी पाटील नरेंद्र खंडेलवाल अंकुश कोलते एस आर जाधव डी एस कुलकर्णी भीमराव कुलकर्णी विश्वंभर भुसारे एस एस खडके पंडितराव खंडागळे संजय डावरे हे प्रशासकीय निवृत्त अधिकारी उपस्थित होते. तीस वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा करून निवृत्त झालेल्यांची उपस्थिती व अनेकांचे मनोगत त्यांनी व्यक्त करताना शेतकऱ्यांच्या सेवेसाठी आपण कार्य केले मातीची सेवा केली शेतकरीच ईश्वर समजून समाजसेवेतून शेतीची धूप थांबवणे मृद संधारण कामे या सह शेतकरी कर्तबगार व उन्नत कसा बनू शकतो ह्यावर आपण भर दिला हीच आपली ईश्वरसेवा व कृषी सेवा प्रगती ची ठरली त्यांच्या हिताचे कार्य व निर्णय शेतीविषयक ज्ञान माहिती प्रायोगिक तत्त्वावर आपण भर दिला त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर आपले अस्तित्व टिकून आहे व चांगले जीवन जगणार आहोत ध्येय धोरण उन्नती ही सर्वांसाठी सुखकारक व लाभदायी असते असे अनेक वक्त्यांनी विचार मांडले. अशा प्रकारचा प्रथमच कार्यक्रम बाजार सावंगीतील निवृत्त कृषी कर्मचारी अंबादास नलावडे यांनी आयोजन केले होते. संस्था चेअरमन किशोर नलावडे, प्रभाकर शिंदे, ज्ञानेश्वर नलावडे, अप्पासाहेब नलावडे भाऊसाहेब नलावडे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन कल्याण सोहळे यांनी करून स्वप्निल नलावडे



# ठाकरे गटाचे कांदाफेक आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्र सरकारने कांदा निर्यात शुल्कवाढ रद्द न केल्यास सत्ताधारी नेत्यांना शेतकरी गावात फिरु देणार नाही, असा इशारा देत शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कांदाफेक आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यात आला. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना माजी आमदार प्रा. शरद पाटील यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले. जिल्ह्यात कांदा उत्पादकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लावल्याने कांद्याचे दर पुन्हा घसरण्यास सुरुवात झाली आहे. मागील काही दिवसांपासून कवडीमोल भावाने कांद्याची विक्री सुरु होती. कांद्याला पंधरवड्यापासून बऱ्यापैकी भाव मिळू लागताच केंद्राने निर्यात शुल्क ४० टक्के केले. एप्रिल ते जुलै या कालावधीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक कांदा सडल्याने फेकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. चांगल्या प्रतीचा कांदा फार कमी प्रमाणात शेतकऱ्यांकडे शिल्लक राहिला होता. या कालावधीत २०० ते ३०० रुपये प्रति क्विंटल दराने शेतकऱ्यांना कांदा विकावा लागला.केंद्र सरकारचे धोरण शेतकरी विरोधी आहे. निर्णयाला केंद्र शासनाने त्वरीत स्थगिती द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर अतुल सोनवणे, बाबाजी पाटील, विलास चौधरी, नाना वाघ, महेश मिस्तरी आदींची स्वाक्षरी आहे.

# सैन्यदलात भरती होत मुलाने वडिलांच्या कष्टाचे केले चीज

## माजी सभापती चव्हाण यांनी कर्तव्यावर जाणाऱ्या जवानांचे केले जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथील अज्ञानसिंग चव्हाण यांना तीन मुले असून परीस्थिती अत्यंत गरीबीची आहे तरी पण तीनही मुलांना शिक्षण दिलं पोलिस किंवा सैन्य दलात भरती होण्यासाठी लाखो मुलं तयारी करतात अत्यंत कठीण परिश्रम करूनही त्यात मोजकेच मुलं यशस्वी होतात मात्र नांदा तांडा गावच्या एका मुलाने लागोपाठ यश मिळवत मोलमजुरी करणाऱ्या बापाचे पांग फेडले आहे आणि गावाचे पण नाव रोशन केले आहे. मुलांनी सरकारी नोकरी किंवा सैन्य दलात भरती व्हावे अशी मनापासून वडीलाची इच्छा होती. त्यांचे हे स्वप्न त्यांच्या एका मुलाने पूर्ण केले मुलगा पवन अज्ञानसिंग चव्हाण याने वर्दी घालून सेवा देण्याचा निर्धार केला. मात्र अत्यंत मागास भाग असलेल्या नांदा तांडा येथील गावकऱ्यांना पवन चव्हाण चा आनंद झाला आणि त्याची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण माजी सरपंच दारासिंग चव्हाण यांनी पवन चव्हाण या जवानाचे शाल श्रीफळ देऊन जंगी स्वागत करण्यात आले. सीमा सुरक्षा सैन्य दलात भरती झालेले येथील जवान प्रथमच मिरवणुकीत लहान मुलांपासून महिला व पुरुषांनी सहभागी झाले होते देशभक्तीचे हे एक आदर्श उदाहरण दिसून आले. देशसेवेची संधी भाग्यशालींनाच मिळते. परमेश्वराने मला ही संधी प्राप्त करून दिली. तिचा देशसेवेसाठी पुरेपूर उपयोग केला जाईल, असेही ग्वाही स्वागत समयी जवान पवन चव्हाण यांनी दिली. याप्रसंगी माजी सरपंच दारासिंग चव्हाण, महिला, बालगोपाल, तरुण मित्र मंडळी समस्त गावकरी मोठ्या संख्येने मिरवणूकीत सहभागी होऊन उपस्थित होते.



# पैठण तालुक्यात कोरडवाहू शेतकऱ्यांना ८५ रुपये गुंठा संततधार नुकसान मदत !

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या वर्षी पैठणसह आनेक ठिकाणी संततधार पावसामुळे पिकाचे नुकसान झाले असल्याने भाजप-शिवसेना( शिंदे गट) सरकारने आठ महीण्यानंतर नुकसान भरपाई देवू केल्याने शेतकर्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु प्रत्यक्षात नुकसान भरपाई अत्यंत तोकडी म्हणजे कोरडवाहू शेतकऱ्यांना ८५ गुंठा तर बागायती शेतकऱ्यांना २२० रूपाने मदत  ती पण एक हेक्टर प्रमाणे तर एक एकर शेती ला फक्त २० गुंठ्यावर  देवू केली असल्याने  अत्यंत कमी प्रमाणात मदत देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांत सरकारबाबत नाराजीचा सूर निघत आहे. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने सरकारला जाब विचारुन उर्वरित ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी लढा उभारणार असल्याचे जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांनी सांगितले.

# करियमचे पुनर्वसन व्हावे यासाठी बालकल्याण समितीकडे स्वाधीन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** केशवस्मूर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाच्या माध्यमातून करियम मूर्ती मोतणार, रा. वना पुट्टर पो.पल्लुर जि. अरियालुर ( तामिळनाडू) या बालकाचे पुनर्वसन व्हावे यासाठी जळगाव बालकल्याण समिती जळगाव यांच्यातर्फे बालकल्याण समितीत बदली करण्याचा  आदेश समतोल ला प्राप्त झाला. त्यानुसार समतोल प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख राहुल पवार सर यांनी तात्काळ निर्णय घेतला, व त्या आदेशाने दि १२ ऑगस्ट २०२३ रोजी बालकाला समतोल प्रकल्पाचे यवस्थापक प्रदिप पाटील व टीम सदस्य महेंद्र चौधरी यांनी  बालकाला सुरक्षित अय्यालूर बालकल्याण समितीस स्वाधीन  केले. करियम हा बालक दि. १६ जुलै रोजी जळगाव रेल्वे स्थानकावर भटकत असताना समतोलचे प्रदिप पाटील यांना मिळून आला होता. करियमला मुबंईच वेड लागले व करियम परत ट्रक ड्रॉयव्हर सोबत गेलाच नाही कामाच्या शोधात मुबंईच्या इमारती पाहत सी.एस टी. स्थानकावर येऊन पोहचला.  जे भेटेल ते काम करियम करायला तयार होता पण तामीळ बोलीभाषेमुळे करियम ला काम तर मिळाले नाही.

चुकीच्या ट्रेन मध्येबसून जळगाव रेल्वे स्थानकावर येऊन पोहचला. जळगाव बालगृहात करियम चे समुपदेशन करीत परिवाराची सविस्तर माहिती काढून समतोल प्रकल्पातर्फे करियमला ५४ दिवसांत पुनर्वसनसाठी अयालूर (तामिळनाडू) बालकल्याण समितीत दाखल करण्यात आले.




# माणुसकी समूहाने पोलिसांच्या मदतीने मनोरुग्ण महिलेला येरवडा मेंटल हॉस्पिटलमध्ये केले दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भीमनगर भावसींगपुरा येथे राहणाऱ्या एक मानसिक रुग्ण महिलेने छावणी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अक्षरश धुमाकूळ घातला होता. तेथील जाणाऱ्या येणाऱ्या पादचाऱ्यांना शिवीगाळ करणे,आरडाओरडा करणे, आणि रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण करणे अशा संदर्भातली तक्रार स्थानिक नागरिकांकडून व तीच्या नातेवाईकानकडु पोलिसांना प्राप्त झाली होती. तेव्हा तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी सदर महिलेची रवानगी छावणी पोलीस स्टेशन येथे केली. तिथे त्या महिलेची चौकशी केल्या असता तिला तीन मुली असून दोन मुली विवाहित आहे. व एक मुलगा/मुलगी लहान आहे.नवऱ्याने निधन झाले आहे, अशी माहिती तीच्या मुलीने पो.स्टे ला दिली असता तेथील पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्था आणि माणुसकी समूहाचे प्रमुख सामाजिक कार्यकर्ते सुमित पंडित यांना ही बाब सांगितली. त्यानंतर सुमित पंडित यांनी पोलिसांच्या मदतीने सदर महिलेला घाटी रुग्णालयात आणून तिथे मानसोपचार विभागात डॉक्टरांना दाखवल्यानंतर डॉक्टरांनी ती मानसिक रुग्ण आहे म्हणून सांगितले. तसेच तिच्या काही वैद्यकीय चाचण्या घेतल्या. पोलिसांच्या मार्फत न्यायालयासमोर तिला दाखल करण्यात आले. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट नंबर १६, औरंगाबाद शहर यांनी तिच्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून तिला पुनर्वसनासाठी आणि पुढील औषध उपचारासाठी मानसिक रुग्णालय येरवडा पुणे येथे दाखल करण्याचे आदेश दिले. माणुसकी समूहाने ह्या महिलेला छावणी पोलीस स्टेशन येथील पोलिसांच्या मदतीने १०८ च्या अँबुलंसने येरवडा पुणे येथे उपचारासाठी दाखल केले. यासाठी पोलीस निरीक्षक कैलास देशमाने,सहाय्यक पोलीस निरीक्षक भागिले, पोलीस उपनिरीक्षक डाके,पोलीस हवालदार आशिप शेख,नंदु सुर्यवंशी, तात्याराव शिंदे,दिलीप जाधव,मंगेश शिंदे,मीना जाधव,माणुसकी समूहाचे सुमित पंडित पूजा पंडित, यांचे या कामी सहकार्य लाभले.

# अतिवृष्टीची रखडलेली नुकसान भरपाई  लवकर द्यावी : देशमुख

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना मे महिन्यात रक्कम देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते आता ऑगस्ट संपतही आला पण काही शेतकऱ्यांना नुकसानीची रक्कम मिळाली आणि काही शेतकऱ्यांना अद्यापही मिळाली नाही संबंधित कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता वरतून आली की होऊन जाईल असे सांगण्यात येत आहे परंतु रखडलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात अद्यापही रक्कम जमा झालेली नाही वारंवार संबंधित कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता हेच उत्तर येत आहे.ऑगस्ट संपत आलेला आहे व खरिपाच्या मशागती करीता शेतकऱ्यांना या पैश्यांची अत्यंत आवश्यकता आहे. ही रक्कम शेतकऱ्यांना त्वरित अदा करण्यात यावी यासाठी सागर सुभाषराव देशमुख शेतकरी सामाजिक कार्यकर्ता यांनी सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

माझ्या शेतीचा गट क्रमांक २७६,१०८,२४६ असा आहे.खरीप २०२२-२३ ची अतिवृष्ठी ची रक्कम मला अद्यापही मिळालेली नाही. सध्या खरीप हंगाम २०२३-२४ सुरु होऊन २ महिने झालेले आहे तरी मागच्या वर्षीची खरीप २०२२-२३ ची अतिवृष्टी ची रक्कम माझ्या खात्यावर जमा झालेली नाही. मागच्या वर्षी अतिवृष्ठी मुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे आपण स्वतः लक्ष घालून माझी खरीपाची रक्कम जी माझ्या हक्काची आहे ती मला अदा करण्यात यावी. सदरील रक्कम देण्यास आणखी विलंब झाल्यास नाईलाजास्तव मला उपोषणाचा मार्ग पत्करावा लागेल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया आपण नोंद घ्यावी. मला व अन्य तालुक्यातील रखडलेल्या सर्व शेतकरयांना लवकरात लवकर अतिवृष्टीची रक्कम देण्यात यावी, असे निवेदन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांच्या कडे देण्यात आले आहे.

# फुलंब्री तालुक्यात कृषी पायाभूत सुविधा एआयएफ कार्यशाळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शनिवारी कृषी विभाग फुलंब्रीतर्फे कृषी पायाभूत सुविधा कार्यशाळा फुलंब्री येथील सभागृहामध्ये घेण्यात आली सदरील कार्यशाळा तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

कार्यशाळेत काढणी पश्चात कृषी पायाभूत सुविधा उभारणी, पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना,अर्ज करण्यासाठी लागणारी कागदपत्रे याविषयीची माहिती देण्यात आली. कृषी पायाभूत सुविधा AIF बाबत शेतकऱ्यांना संक्षिप्त व्हिडिओ दाखवण्यात आला तसेच माननीय संचालक आत्मा श्री. दशरथ तांभाळे यांची AIF संदर्भातील मार्गदर्शक ऑडिओ क्लिप लावण्यात आली.

आजच्या कार्यशाळेत तालुका कृषी अधिकारी श्री भारत कासार यांनी कृषी विभागाच्या योजनांना सदरील योजनेत परावर्तित करून कसा लाभ घेता येईल याविषयी माहिती दिली. सदरील कार्यशाळेत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री मकरंद नन्नावरे यांनी गटामार्फत व कंपनीद्वारे कुठल्या बाबी घेता येईल याबाबतची माहिती दिली. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विवेक चव्हाण यांनी शेतकरी उत्पादक कंपनी व गटांना बँकेत येणाऱ्या अडचणी विषयी चर्चा केली कार्यक्रमास श्री मंडळ कृषी अधिकारी एन. एस. जोरी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे प्रतिनिधी हे उत्कर्ष काळे महाराष्ट्र ग्रामीण बँक बनसोडे साहेब व पीएमएफएमइचे पंकज नाजने व आत्म्याचे जगदीश जाधव उपस्थित होते. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मकरंद नन्नावरे यांनी केले.



# तलाठी भरती परीक्षेत गोंधळ; कंपनीविरुद्ध कारवाई करा

## युवा सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन : विद्यार्थ्यांना कंपनीकडून भरपाई देण्यात यावी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तलाठी परीक्षा घेणाऱ्या टी.सी.एस. कंपनी विरुद्ध कठोर कायदेशीर कारवाही करावी व तलाठी परीक्षेत खोळंबा घातल्याने विद्यार्थ्यांना कंपनीकडून भरपाई देण्यात यावी, यासाठी युवा सेनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन व निदर्शने महाराष्ट्र राज्यात नुकत्याच 17 ऑगस्ट ते 14 सप्टेंबर या कालावधीत तलाठी भरती परिक्षा घेण्यात येत आहे. दि. 21/08/2023 रोजी राज्यात धुळे जिल्हासह अनेक ठिकाणी परिक्षा घेणाऱ्या टि.सी.एस. कंपनीच्या निष्काळजीपणामुळे तसेच तंत्र अथवा व नियोजन शून्य बेफिकीर तसेच आवश्यकतेनुसार योग्य त्या संसाधनांचा पुरेसा वापर न केल्याने राज्यात परीक्षेचा खोळंबा झाला आहे. या कारणास्तव राज्यातील तळागाळातील विद्यार्थ्यांनी अहोरात्र मेहनत घेवुन केलेल्या अभ्यासावर व मेहनतीवर पाणीफेरण्याची वेळ आली आहे. तलाठी ही क्लास 3 सदरातील पोस्ट आहे. सदर परिक्षेस भाग घेणारे अधिकतम विद्यार्थी हे आर्थिक व सामाजिक अत्यंत कमकुवत असलेल्या भागातील असतात. सन 2023-24 मध्ये तलाठी भरती प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांकडुन तब्बल दुपटीने फी वसुल करण्यात आलेली आहे असा आरोपही या निवेदनात करण्यात आला आहे. सदर राज्य शासनाकडुन फी वाढीचे कारणे हे सुविधांमुक्त, पारदर्शक व उत्तमरित्या नियोजनबद्ध परिक्षा घेण्यात येतील असे आशयाचे कारणे देवुन हजारो रुपयांमध्ये अधिकतम अत्यंत गोरगरिब वर्गातील विद्यार्थ्यांकडुन कोटयावधी रुपयांचे परिक्षा शुल्क आकारुन घेण्यात आले असल्याचे निवेदनात सांगण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात टि.सी.एस. कंपनी हि सदर परिक्षा घेण्यास असक्षम व असमर्थ असल्याची बाब केवळ तिस-याच दिवशी लक्षात आली आहे. अद्याप जवळपास संपुर्ण महिन्याभराचा परिक्षा घेण्याचा कार्यक्रम अपुर्ण आहे.

अश्या परिस्थितीत कोटयावधी रुपयाचा शुल्क आकारुन देखील टि.सी.एस. कंपनी हि आश्वासीत केल्याप्रमाणे योग्य दर्जाची सुविधा देण्यास असमर्थ झाली आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना मोठयाप्रमाणावर त्रास झाला आहे. त्यामुळे सदर टि.सी.एस. कंपनी विरुद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे परिक्षा वेळेवर न झाल्याने व अथवा इतर कोणत्याही कारणास्तव झालेल्या गैरसोय व अथवा त्रासाबद्दल शासना स्तरावर टि.सी.एस. कंपनीकडुन विद्यार्थ्यांना भरपाई देवविणे जरुरीचे आहे असेही सांगण्यात आले आहे. यापूर्वी झालेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये मोठया प्रमाणावर घोटाळे झालेले आहे. या घोटाळयांमध्ये राज्य शासनातील उच्च पदस्थ काही प्रशासकीय अधिका-यांसह सदयस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात असलेल्या काही मंत्र्याविरुद्ध देखील आरोप झालेले होते. तांत्रिक बिघाडाच्या नावाने पुन्हा काही घोटाळयाचे कारस्थान तर शिजत नाही आहे ना..? असा प्रश्नही उपस्थितीत करण्यात आला. याबाबत सविस्तर चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच सदर तलाठी परिक्षा घेण्यास टि.सी.एस. कंपनी सक्षम आहे का? याबाबत त्वरित (2-3 दिवसात) निर्णय घेण्यात येवुन टि.सी.एस. कंपनी असक्षम असल्यास सदर परीक्षा घेण्यास योग्य त्या सक्षम कंपनीस परिक्षा घेण्याचे कंत्राट देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यापुढे प्रलंबित असलेल्या परिक्षेत विद्यार्थ्यांना कोणताही त्रास अथवा अडथळा तसेच विलंब होणार नाही. याची काळजी शासन स्तरावर घेण्यात यावी. उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास विद्यार्थ्यांच्या वतीने युवा सेना रस्त्यावर उतरुन जनआंदोलन छेडू असा इशारा युवा सेने तर्फे करण्यात आला आहे. या ठिकाणी उपस्थित युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, विस्तारक तथा उपजिल्हा  प्रमुख कुणाल कानकाटे, युवतीसेना जिल्हा अधिकारी सोनीताई सोनार, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, महानगरप्रमुख मनोज जाधव, विधानसभा क्षेत्र प्रमुख योगेश मराठे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख सिद्धेश नाशिककर, रोहित अमृतकर, भुषण मोरणीस, राज चव्हाण, सोमेश कानकाटे, जयेश फुलपगारे, अमोल साळवे, अनिल  मिस्त्री, मनोज मोरे, शुभम फुलपगारे, हर्षल फुलपगारे, विद्यार्थी जयेश रोकडे, गोपाल चौधरी, ऋषिकेश कासार, पंकज फुलपगारे, तुषार कोळी, प्रल्हाद पाटील, भूषण पाटील आदी उपस्थित होते.





# अन् कापसाची उगवण झालीच नाही

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे कानडगाव शिवारात शेत गट क्रमांक १३ मधे कापसाची लागवड केली परंतु उगवणीच न झाल्याने तलाठ्यांकडून पंचनामा करण्यात आला. कानडगाव शिवारात शेत जमीन गट क्रमांक १३मधे साईनाथ जाधव विठ्ठल जाधव व गजानन जाधव संतोष जाधव यांनी खरीप पीक हंगाम वर्ष २०२३-२४साठी कापूस लागवड केली परंतु उगवणीच न झाल्याने शेतकऱ्यांनी तक्रार केली होती. त्यावरून तलाठ्यांकडून घटनास्थळी जावून पंचासमक्ष पिक पाहणी केली यात उगवणी न होता दिड लाखांचे नुकसान झाले यावरुन सुरेश जाधव, भुजंगराव जाधव, बाबासाहेब मालकर, केशव जाधव, विष्णू जाधव  यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला.

# शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील आदर्श जिल्हा परिषद प्रशालाच्या चालू शैक्षणिक सत्रात शिक्षकांचा अभाव असल्याने शालेय विद्यार्थीच्या शिक्षणावर परिणाम होत असून तातडीने या शाळेवर शिक्षक पाठविण्याची मागणी पालक वर्ग शिक्षण प्रेमी नागरिकांतून होत आहे. औरंगाबाद जिल्ह्यात एक नंबरवर व आदर्श असलेल्या या शाळेत पाच ते दहावी पर्यंत वर्ग असुण साडेआठशे दरम्यान विद्यार्थी संख्या आहे. त्यात कॉपी मुक्त परीक्षा होत असताना टक्केवारीत आघाडीवर आहे व सर्व शिक्षण वर्ग सेमी इंग्रजीत सुरु आहे. तर शाळेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. मात्र चालू शैक्षणिक सत्रापासून मुख्याध्यापक प्रभारी आहे व पाचसहा शिक्षकांच्या जागा रिक्त आहे, अशात साडेआठशे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचे चिन्ह आहे.

एकतर येथे खासगी शाळेंचा भरमार व चमकधमक असताना जिल्हा परिषद शाळेने आपली परंपरा कायम ठेवत नावलौकिक मिळवला आहे. जिल्हाभरात नाव आहे. परंतू असे असताना शिक्षक अभावी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रश्न उभा राहिला आहे. तरी वरिष्ठांनी याची दखल घेऊन तातडीने सावंगी शाळेत शिक्षकांच्या रिक्त जागा भराव्या, अशी मागणी विद्यार्थी पालक शिक्षणप्रेमी नागरिकांनी केली आहे.

# अजिंठा ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आरंभ

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** तालुक्यातील अजिंठा येथे दिनांक 20/8/2023,रोजी अजिंठा श्री राम मंदिर येथे ग्रंथराज  ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सुरुवात करण्यात आली    तसेच या शुभ प्रसंगी कलश पूजन अंजनाताई राजपुत, किसान करणी सेना प्रदेश अध्यक्ष यांच्या शुभ हस्ते करण्यात  आले  यवेली उपस्थित श्री ह, भ, प,गणेश महाराज चुंबळे आलंदी देवाची यांच्या अमृत वाणीतुन 12 वा अधाय प्रवचन सोहळयास सुरुवात झाली यावेली उपस्थित गंगाताई चव्हाण,शकुंतला बैरागी .अमोल चोंडिए. नीरज श्रीवास्तव. ज्ञानसिंग राजपुत .विजय पगारे .दीपक चव्हाण .इत्यादि लोकांची व गावक्रयां ची उपस्थिति होती तसेच हा सोहाला 7दिवस चलनार आहे यात दररोज ज्ञानेश्वर पारायण चालणार आहे व हरिपाठ इत्यादि रुपरेशा राहिल आनी या धार्मिक कार्यक्रमात या सप्ताहात जस्तित जास्त लोकानी उपस्थित राहावे या  कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे अहवाहन अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष सौ अंजना राजपुत यानी केले.

# मराठा समाजाने खंबीर राहावे : खेडेकर

## कन्नड येथे मराठा सेवा संघाचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथे राष्ट्रीय स्वयंम संघ, व भिडे, पुरंदरे सारखे लोक छत्रपती शिवाजी महाराजाचा चुकीचा इतिहास सांगून समाजात इदुष्ट निर्माण करून आपल्या मुलांना वाचण्यापासून दूर ठेवून नाचण्यामध्ये आडकविण्यात सातत्याने प्रयत्न केला जातो आहे. मराठा व बहुजन समाजाचा सत्यनाश करण्याचा विडा आर. आर. एस. एसने उचलेला आहे. त्यामुळे आता आपल्या मुलांना खरे शिवचरित्र वाचण्यासाठी देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अँड पुरुषोत्तम खेडकर यांनी रविवारी केले.

राजुरेश्वरी मंगल कार्यालयात मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित केलेल्या मराठा समाजाचा मेळाव्यात खेडकर बोलत होते. पुढे बोलताना खेडेकर म्हणाले किं, मराठा समाजाने आता सरकारच्या भरवशावर न राहता चांगल्या कामासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन समाजाने समाजाचा विकास करणे काळाची गरज आहे. बहुतांश मराठा समाजाकडे शिवचरित्र उपलब्ध नाही ही खंत देखील खेडकर यांनी व्यक्त केली. सुरुवातील जिजाऊ माँसाहेबाच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण सुप्रसिद्ध गायक राहुल खरे यांनी गायलेल्या जिजाऊ वंदना कार्यक्रमाने सुरुवात करण्यात आली. विद्याचरण कडवकर यांनी प्रास्ताविक केले, डॉ. संजय गायकवाड यांनी सूत्रसंचालन शेखर शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. अर्जुनराव  तनपुरे, धनंजय पाटील,  माजी आमदार किशोर पाटील, माजी आ. नामदेव पवार, माजी आमदार नितीन पाटील,  माजी जि प सदस्या संजनाताई जाधव,उद्योजक मनोज पवार,  विद्याचरण कडवकर, बाळराजे मुळीक, नंदकिशोर भोंबे, संतोष कोल्हे, प्रकाश घुले, जयेश बोरसे, सतिश भदाणे, दीपक एरांडे प्रभाकर मनकटे आदीह मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत  होते. शेती, वैद्यकीय, शैक्षणिक, क्रीडा, , सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बाबासाहेब जाधव, कल्पना जाधव, सेंद्रिय शेतीत काम करणारे अजय जाधव, आदर्श शेतकरी तेजराव बारगळ, कारभारी मनगटे, सुभाष जंजाळ, ज्ञानेश्वर पवार, विलास आहेर, किशोर पवार, रावसाहेब निकम, गणेश सांळुखे, उद्योजक मनोज पवार, बाळासाहेब खंडागळे, मुक्तानंद पाटील, वकिल सेवा, भगवान चव्हाण, महेंद्र देशमुख, शिक्षक सेवा, प्रा. पंकज देशमुख, श्रीमती जयश्री पाटील,  शिवराज पाटील, हर्षवर्धन पवार, दिपक एरांडे, पी.एस. सुरोसे, सुभाष बनकर, संतोष दारकुंडे, सविता बनकर, सरपंच आकाश ऊबाळे, भागीनाथ   मंडळ अधिकारी सतिष भदाणे, बाळासाहेब कदम, लक्ष्मण कटीग,  दिलीप अप्पा यांचा खेडेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# रिपरिप पावसामुळे पिकांना नवसंजीवनी

## शेतकरी सुखावला; चांगल्या उत्पन्नाची आशा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** गेल्या पंधरवड्यापासून पावसाने परिसरात दडी मारल्याने शेत जमिनी कोरड्या झाल्या होत्या. सोयाबीन पिकाला पाण्याची नितांत गरज होती, मात्र परिसरात १७ ऑगस्टपासून रिपरीप का असेना सुरू असलेल्या पावसामुळे कपाशीसह विशेष करून सोयाबीन पिकाला नवसंजीवनी मिळाली आहे. त्यामुळे पिकासह जमीन ओली झाल्याने शेतकरी सुखावला असून त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे. यावर्षी परिसरात मान्सूनचे आगमन उशिरा झाल्यामुळे पेरण्या थांबल्या होत्या २५ जूनला पावसाने हजेरी लावली होती त्यामुळे शेतकऱ्यांनी कपाशी सोयाबीन तूर मिरची या प्रमुख पिकांची लागवड केली होती. पेरणी उशिरा झाली असली तरी पावसाने साथ दिल्याने पिकेसुद्धा चांगली अंकुरली होती. शेतकऱ्यांचे दुबार-तिबार पेरणीचे संकट टळले होते. परिसरात सर्वच पिके डोलदार व चांगली बहरली होती. मात्र गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने परिसरात दडी मारल्याने शेतजमिनी कोरड्या होऊन पिके कोमेजली होती. सोयाबीन पीक हे तीनच महिन्याचे व फुलावर असल्याने सोयाबीनला पाण्याची नितांत गरज होती. त्यामुळे शेतकरी पावसाची चातकासारखी वाट पाहत होते. पावसाने उसंत दिल्याने आहे. या काळात शेतकऱ्यांनी खत, फवारणी, डवरणी, निंदन या सर्व कामांचे नियोजन केले; मात्र अलीकडे पावसाने बरीच उसंत दिल्याने शेतजमिनी कडक आल्या होत्या त्यामुळे आता डवरणी निंदन खतं ही कामे थांबली होती परिणामतः पावसाअभावी सोयाबीन पिकावर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत होता. शेतकरी पिके वाचविण्यासाठी धडपड करीत होते. पावसाअभावी शेतकरी हतबल झाला होता. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय नाही, अशा शेतकऱ्यांची पंचाईत झाली होती. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके करपू लागली होती. १७ ऑगस्टपासून चारठाणासह परिसरात हलक्या रिपरिप पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली असून पिके चांगली बहरली आहेत. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# भाविक भक्तांना देवयात्रा, निवडणुकीचा खेळ सुरु

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यात सध्या भाविक भक्तांना देव यात्रासाठी मोफत यात्रा करविण्यात येत असल्याने भाविक भक्तांत आनंदाचा वातावरण असुण गावस्तरावरील कार्यकर्ते भक्तांना साद घालून देव यात्रेला तयार करत रवाना करत आहे.सद्या या देवयात्रेची चर्चेला उधाण आले आहे तर निवडणूक जवळ आल्याचे चर्चा सध्या जोरात सुरु आहे. गंगापूर -खुलताबाद मतदार संघात सद्या २०२४निवडणुकीची तयारी सुरू झाली असुण जो तो आपापल्या परीने निवडणुकीचा जुगाड व तयारी सुरू केली आहे.विद्यामान आमदार जे प्रथम अपक्ष व नंतर दोनदा भाजपा पक्षांकडून निवडून आलेले आहे.त्यांचा तिसरा टर्म सुरु आहे.तर चौथ्या टर्मसाठी तयारी सुरू केली आहे.तर राष्ट्रवादी काँग्रेस,काँग्रेस, बीअर एस, शिवसेना व अन्य पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून ही तयारी सुरू झाली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे सतिष पाटील चव्हाण यांचे कार्य जोरात सुरु आहे. ठिकठिकाणी विविध कामांसाठी निधीचा वाटप व कामे सुरु आहेत. तर विद्यामान आमदार प्रशांतभाऊ बंब यांच्याकडून विविध प्रमाणपत्रे शिबीरे पत्रापेटी व आता देवदर्शन यात्रा अष्टविनायक व गुजरात येथे भाविक भक्तांना देवयात्रा बसद्वारे मोफत खुलताबाद तालुक्यात ठिकठिकाणी असे चित्र दिसून येत आहे.गावस्तरावर कार्यकर्ते घरोघरी जाऊन भक्तांना साद घालून यात्रेसाठी तयार करत देवदर्शनाची मोफत फेरी काढत आहे. तालुकाभर याची चर्चा असुण तालुक्यातील अनेक ठिकाणाहुन भाविकभक्त लक्झरी बस द्वारे देवदर्शनाला गेले आहे. या यात्रेवरून तालुक्यातुन अनेक नागरिकांतून निवडणुक आली की काय?असे खोचकपणे टोमणं मारण्यात येत आहे.

# निशा वाकुडे यांना पीएच.डी.पदवी प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इंग्रजी विभागातील संशोधक विद्यार्थिनीं निशा परमानंद वाकुडे यांना इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी डॉ. उत्तम अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली "द रायझिंग व्हाईसेस : ए स्टडी ऑफ सिलेक्ट ऑटोबायोग्राफीक्स ऑफ अमेरिकन इंडियन रायटर्स" या विषयावर विद्यापीठात शोध प्रबंध सादर करून,त्यांनी पीएच.डी.पदवीची मौखिक परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना पीएच.डी.पदवी घोषीत केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल डॉ.मुस्तजीब खान,डॉ. प्रकाश सिरसाट,विजय अढागळे यांनी अभिनंदन केले. तसेच सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# कॉसमॉस बँकेचा पंचविसावा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** शुक्रवार रोजी दि कॉसमॉस कॉ ऑप बँक लि. पुणे सिडको, औरंगाबाद शाखेचा 25 वा वर्धापन दिन महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कॉसमॉस बँक व मेडिकव्हर हॉस्पिटल औरंगाबाद यांच्या संयुक्त वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते आणि सदर उपक्रमास ग्राहक वर्गाचा भरभरून प्रतिसाद मिळाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रमेश अग्रवाल, तुळशीराम नेमाडे, देवेंद्र उबाळे, सुदाम घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच इतर सन्माननीय खातेदार, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. औरंगाबाद विभागाचे जनरल मॅनेजर अविनाश चव्हाण यांनी बँकेच्या वाटचालीची सविस्तर माहिती दिली. बँकेची विशेष ठेव योजना कॉस्मो मान्सून बोनाझा तसेच हॅलो डॉक्टर कर्ज योजना, कॉस्मो उद्योग कर्ज योजना, कॉस्मो मर्चंट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना इत्यादी कर्ज योजना बाबत मार्गदर्शन केले. बँकेच्या कॉस्मो मान्सून बोनाझा पंधरा महिने मुदत ठेव या कालावधीच्या ७.७५% आकर्षित व्याज दरामुळे ग्राहकाचा भरभरुन प्रतिसाद मिळत आहे. कॉस्मो मान्सून बोनाझा ही मुदत ठेव योजना ठराविक कालावधीसाठी आहे, त्यामुळे या योजनेचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बँकेतर्फे अविनाश चव्हान यांनी केले आहे. कर्ज योजनेमध्ये कॉस्मो उद्योग कर्ज योजना व कॉस्मो मर्चंट कर्ज योजना ज्या खासकरून छोटे व्यापारी, छोटे उद्योजक यांच्यासाठी तयार केलेल्या आहेत. कॉस्मो उद्योग लोन साठी कमीत कमी व्याजदर ७.५०%, कॉस्मो मर्चंट लोन साठी कमीत कमी व्याजदर ९.00% तसेच शैक्षणिक कर्ज योजना ज्याचा व्याजदर मुलींसाठी कमीत कमी ८% टक्के व मुलांसाठी कमीत कमी ८.४०% असून सदर सर्व कर्ज योजनांना ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या सर्व कर्ज योजनेचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आव्हान बँकेच्या वतीने जनरल मॅनेजर अविनाश चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास सर्व उपस्थित ग्राहकांचे आभार चीफ मॅनेजर आकांक्षा मुळे मॅडम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नरसिंह देशपांडे, सुनील अंधारे, निरंजन संगेकर, महेश नेवारे, श्रीपाद जोशी, काजोल चव्हाण, माणिक सावंत आदींनी परिश्रम घेतले.



# माणुसकीचे घडले दर्शन; सापडलेली कागदपत्रे केली परत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** आजच्या या अस्वस्थ काळात सोशल माध्यमांचा योग्य वापर करीत माणुसकीचे दर्शन घडले असून एम.जी.एम विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे हरविली होती; ती त्याला परत करण्यात आली आहेत. एम.जी.एम विद्यापीठात बी.सी.ए साठी प्रवेश घेतलेल्या गौरव नागरेचे मुळ कागदपत्रे हरवली होती. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ती कागदपत्रे 'द पीपल्स पोस्ट'चे उपसंपादक प्रतीक माधुरी ओमप्रकाश कुकडे यांना सापडली. त्यांनी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सादिक शेख व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे मराठवाडा उपाध्यक्ष डॉ अमोल धंद्रे यांच्या मदतीने सामाजिक माध्यमांचा योग्य वापर करीत सदरील विद्यार्थ्यांला त्याची कागदपत्रे दिली आहेत. यातून एक सकारात्मक संदेश समाजाला जात आहे.





# भांगशीमाता गड पायथ्याशी पशुपतेश्वराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीनगर येथून जवळच असलेल्या शरणापूर येथिल भांगशीमातागड पायथ्याशी भारतातील एकमेव दिव्य पशुपतयेश्वराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा हजारोंच्या उपस्थितीत पारपडला. या सोहळ्याची सांगता. प.पु. परमांनदगिरी महाराज यांच्या प्रवचनाने झाली. यावेळी ते म्हणाले की,ज्या देशात नरजातीचा सन्मान केला जातो तो देश सन्मानाने जगात आपल्या संस्कृतीची धर्म पताका मानाने फडकवतो. भवभयाचा नाश करणारी ही भांगशीमाता आहे. श्रावणी सोमवार आपल्या जीवनात तेज, क्षमा,शांती आणि पृथ्वीमातेचे दर्शन रोज घेत चला तसा संकल्प करत पशुपतयेश्वराची पिंड आपण या ठिकाणी स्थापना करण्यात आली. पर्यावरणाची आज हानी होत आहे ती होवू नये म्हणून मानवाने पर्यावरणाचे महत्त्व ओळखायला हवे व पाण्याची बचत करायला हवी असे सांगितले.यावेळी ब्रम्हवृंदाच्या व यजमानांच्या उपस्थितीत कलशारोहण करण्यात आले. शिवाकडून आपण आपल्याला शिव जागृत करत आपल्या नित्यनेमाला स्थान द्यायला हवे. पुरातन मंदिरे राजा महाराजांनी बांधलेले आहे परंतु हे मंदिर आजच्या शेतकरी राजाने बांधले आहे. यासाठी आज राजा शेतकरी आहे. मोठ्या मनाचा राजा हा शेतकरी आहे, असे सांगितले.

शेवटी आरतीने व महाप्रसादाने या उत्सवाचा समारोप झाला.यावेळी महाराष्ट्रभरातून हजारों भाविकभक्तांनी ऐतिहासिक सोहळ्यास महापूजनाचे साक्षीदार होत महाप्रसाद घेवून धन्य झाले.वेदमुर्ती श्री.पं.निलेश पाठक, अंदरसुल जि.नाशिक जोशी गुरुजी मिटमिटा, पांडव गुरुजी, संभाजीनगर व इतर ब्रम्हवृंद यांनी यजमानांना पौरौहित्य करत होते. या कार्यक्रमाला शिवसेना ठाकरे गटांचे उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची उपस्थिती होती तर येथिल व्यवस्थापक सांडू पवार व येथिल गूरुकूलातील शिक्षकवृंद ,विद्यार्थी यांनी चोख व्यवस्था ठेवत परिश्रम घेतले.सर्व गावकरी शरणापुर वंजारवाडी माळीवाडा देवगिरी संभाजीनगर व भाविक भक्त उपस्थित होते.

# जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या

## इंधनाकरिता वनातील लाकडांचा वापर

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** गॅस, पेट्रोल आणि डिझेलसह अन्य जीवन आवश्यक वस्तूंच्या किमतीने कळस गाठला आहे. त्यामुळे या दरवाढीने ग्रामीण भाग होरपळल्या जात आहे, या भाववाढीला केंद्र सरकार सह राज्य सरकारही तेवढेच जबाबदार आहे. इंधना करिता वनातील लाकडांचा वापर होतो. त्यामुळे जंगले नष्ट होत चालली असे भासवून सरकारने शहरी ग्यास ग्रामीण भागातील गरिबांच्या माथी मारला, काही दिवस मोफत व नंतर हळूहळू पैसे आकारणी करून सिलेंडर दिल्या जात होते तेच सिलेंडर आता हजारी पार करून नगदीने खरेदी करावे लागत आहे. याचे चटके ग्रामीण भागातील शेतकरी व मजुराला सहन करावे लागत आहे. कमी दरातील सिलेंडर योजना बंद आता करण्यात आली. त्यामुळे मोलमजुरी करणाऱ्या या कुटुंबाना हे सिलेंडर ११०० ते ११५० रुपयाला खरेदी करावा लागत आहे. सोबत पेट्रोल आणि डिझेलबाबत तीच परिस्थिती निर्माण झाली असून तालुक्यातील जनतेला प्रवासाकरिता खाजगी वाहनाचा वापर करावे लागत आहे. यात डिझेल पेट्रोलच्या दरवाढीने वाहनांचे प्रवास भाडे दाम तिप्पट चौपट झाले आहेत. हा फटका सामान्य जनतेला मुकाट्याने सहन कारावा लागत आहे. तसेच जीवन आवश्यक मधील अन्न-वस्त्र यांचीही दरवाढ झाली आहे. खाण्याचे तेल डाळ, साखर यांसह अनेक वस्तूंची दरवाढ होत असल्याने ग्रामीण भागातील गरीब वर्ग यात होरपळल्या जात आहे.



# शिवसेनेचे रितेश ठाकूर उपसरपंचपदी बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** बांधपाडा( खोपटे ) ग्रामपंचायत उपसरपंच सुजित म्हात्रे यांनी राजीनामा दिल्यामुळे उपसरपंच पद रिक्त झाले होते, या उपसरपंच निवडीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर व तालुका संघटक बी. एन. डाकी यांच्या आदेशानुसार रितेश ठाकूर यांना उमेदवारी दिली गेली, तसेच उपसरपंच पदासाठी त्यांचा शिवसेना,काँग्रेस आघाडी तर्फे अर्ज दाखल केला.पण ग्रामपंचायत सदस्य देवानंद ठाकूर यांनी सुद्धा उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केला, परंतु शेवटच्या क्षणी त्यांनी उमेदवारी मागे घेतल्याने शिवसेनेचे रितेश ठाकूर हे बिनविरोध उपसरपंच म्हणून निवडून आले.त्याबद्दल खोपटे पंच-क्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उपसरपंच पदी निवड होताच सोमवार दिनांक 21 ऑगस्ट 2023 रोजी नवनिर्वाचित उपसरपंच रितेश ठाकूर यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले, यावेळी मनोहरशेठ भोईर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन व रितेश ठाकूर यांना पेढा भरवून त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यस शुभेच्छा दिल्या.

तसेच उपसरपंच झाल्यावर रितेश ठाकूर यांना शुभेच्छा देण्यासाठी उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर,तालुका संघटक व अवजड वाहतूक सेना रायगड जिल्हा उपाध्यक्ष व तालुका संघटक बी. एन डाकी,गटनेते गणेश शिंदे, शिवधन पतपेढी,चिरनेरचे अध्यक्ष गणेश म्हात्रे, तालुका संघटिका व सरपंच भावना म्हात्रे, ग्राहक संरक्षण कक्षाचे तालुकाध्यक्ष धीरज बुंदे, शहर संघटक महेश वर्तक, सरपंच प्रीती पाटील, खासदार प्रतिनिधी अजित ठाकूर, शाखाप्रमुख विश्वनाथ पाटील,शाखाप्रमुख बाळकृष्ण ठाकूर, शाखाप्रमुख नंदकुमार ठाकूर, काँग्रेस वरिष्ठ केशव घरत, भालचंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच सुजित म्हात्रे, ठाकूर,सुशांत ठाकूर, विपुल ठाकूर, राजू ठाकूर,साहिल पाटील, सत्यजित पाटील, ग्रामविस्तार अधिकारी रवी म्हात्रे, तसेच गावातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर